रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ७५
www.ramprahar.com
◆ शुक्रवार, २ ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

'जलव्यवस्थापनातून पूर आणि दुष्काळावर उपाय करावा'/२
पनवेलमध्ये रिड्यूस, रियूज आणि रिसायकल सेंटर/६
पाकला हरवत भारतीय हॉकी संघ फायनलमध्ये/८

## कर्जमाफीचा तिसरा हप्ता शेतकऱ्यांना वितरित



**मुंबई :** राज्यात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाल्यानंतर शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. सुरुवातीला दुष्काळी तालुक्यांच्या यादीतून वगळण्यात आलेल्या काही तालुक्यांचाही आता या यादीत समावेश करण्यात आला आहे. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या मुलांना परीक्षा शुल्कातून सवलत देण्यात आली असून नुकसानीचे पंचनामेही सुरू करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर आता शेतकरी कर्जमाफीसंदर्भातही सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत कर्जमाफीचा तिसरा हप्ता वितरित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या हप्त्याचे वितरण करण्यात आले. तिसऱ्या टप्प्यात राज्यातील ३.२७ लाख शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये एकूण तीन हजार १६१ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत.

# दिवेआगर सहल ठरली अखेरची!

## आळंदीतील आठ विद्यार्थ्यांचा समुद्रात बुडून मृत्यू

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या दिवेआगर येथील समुद्रात बुडून आळंदी येथील आठ विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (दि.१) घडली. यामुळे हळहळ व्यक्त होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार दिवेआगर येथे मृत पावलेले विद्यार्थी हे आळंदी (जि. पुणे) येथील असून विनर्स अकॅडमीत अकरावीचे शिक्षण घेत होते. २५ विद्यार्थी, १७ विद्यार्थिनी आणि सहा शिक्षक असे ४८ जण सहलीसाठी आले होते. त्यातील आठ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये तन्मय दत्तात्रय वहीले, सुमित भरत अहिरे, प्रणव रामदास बनसोडे, कैवल्य सतीश वासनकर, राजवीर युवराज वहीले, यश किरण वानखेडे, सोहम तुकाराम भांडवलकर, कौस्तुभ संदीप दौंड (सर्व वय १६, रा. आळंदी) यांचा समावेश आहे.

कोकणच्या निसर्गसौंदर्याने नटलेला जिल्हा म्हणून रायगडची ओळख आहे. विविध भागांतून पर्यटक, विद्यार्थी येथील पर्यटनस्थळी विशेषकरून समुद्रकिनारी मोठ्या संख्येने येत असतात. अशाच प्रकारे आळंदी येथील विद्यार्थ्यांची सहल दिवेआगर येथे आली होती. त्यातील काही विद्यार्थी समुद्रात उतरले, मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने हे विद्यार्थी खोल पाण्यात बुडाले.

विद्यार्थी बुडत असल्याचे लक्षात येताच किनाऱ्यावर मोठा गोंधळ उडाला. तिथे उपस्थित असलेले महाकाली वॉटर स्पोर्ट्‌सचे कर्मचारी आणि स्थानिक ग्रामस्थांनी जीवाची पर्वा न करता तातडीने समुद्रात धाव घेतली. त्यांनी शर्थीचे प्रयत्न करून आठही विद्यार्थ्यांना पाण्यातून बाहेर काढले.

यानंतर या विद्यार्थ्यांना तातडीने जवळच्या बोर्ली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले, मात्र आठही जणांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. पोलीस आणि प्रशासन घटनास्थळी दाखल झाले असून अधिक तपास सुरू आहे.




## सेवा संकल्प अभियानांतर्गत वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित सेवा संकल्प अभियानांतर्गत 'विकसित भारत २०४७ सशक्त विद्यार्थी, समृद्ध भारत' या संकल्पनेवर आधारित तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ गुरुवारी (दि. १) सीकेटी विद्यालयात पार पडला. या सोहळ्यास भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



'विकसित भारत' या मुख्य विषयावर केंद्र व तालुका स्तरावर पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. अंतर्गत केंद्र स्तरावर पार पडलेल्या स्पर्धेत ४५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यातून प्रत्येक गटात प्रथम क्रमांक पटकावलेल्या एकूण ६३ गुणवंत विद्यार्थ्यांची तालुका स्तरासाठी निवड झाली.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व कौशल्याचे व वैचारिक स्पष्टतेचे मनापासून कौतुक केले. राष्ट्र उभारणीत विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगत त्यांनी विजेत्यांचा सत्कार केला व त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच उत्तेजनार्थ क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गुणगौरव करण्यात आला.

कार्यक्रमास पं. स. सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य प्राची जाधव, माजी सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य वैशाली सावंत, निलम भिंगारकर, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, गटशिक्षण अधिकारी शाहू सकपाळ, विस्तार अधिकारी एस.आर. मोहिते यांच्यासह विविध केंद्रांचे प्रमुख, शिक्षक, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

## जनजातीय क्षेत्राच्या विकासासाठी २५ हजार कोटींची तरतूद

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

संसदीय संकुल विकास परियोजनेंतर्गत तयार होणाऱ्या कार्ययोजना राबविण्यास राज्य शासन तत्पर आहे. या योजनेच्या माध्यमातून जनजातीय क्षेत्राच्या विकासासाठी २५ हजार कोटींची तरतूद केली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि.१) सांगितले.



सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित संसदीय संकुल विकास परियोजनेच्या उद्घाटन कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. जनजातीय क्षेत्राच्या विकासासाठी परियोजनेच्या माध्यमातून गावातच रोजगारनिर्मिती करून स्थलांतर रोखण्यासह जनजातीय क्षेत्रातील नागरिकांचे जीवनमान उंचावून सामाजिक परिवर्तन घडविता येईल, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमास आदिवासी विकासमंत्री अशोक उईके, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार, आमदार रवींद्र चव्हाण व योगेश सागर, माजी खासदार हिना गावित, योजक संस्थेचे गजानन डांगे, संसदीय संकुल परियोजना संयोजक व्ही. सतीश आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आदिवासी क्षेत्राचा विकास, नागरिकांचे जीवनमान उंचावणे, रोजगारनिर्मिती आणि स्थलांतर रोखणे ही परियोजनेची प्रमुख उद्दिष्टे आहेत. केंद्र आणि राज्य शासनाच्या जनजातीय क्षेत्रासाठी असलेल्या योजनांचे समायोजन करून एकाच गावाऐवजी गावांचा समूह तयार करीत एकात्मिक पद्धतीने विकास करणे आवश्यक आहे. नागरिकांच्या जीवनात उन्नती घडविणाऱ्या उपक्रमांचा त्यात समावेश असणार आहे. त्यांचा लाभ खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासह अंमलबजावणीवर प्रभावी नियंत्रण ठेवावे.

## मुंबई-रेवस प्रवासी बोटसेवा पुन्हा सुरू

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील भाऊचा धक्का ते अलिबागच्या रेवसदरम्यान बंद असलेली प्रवासी बोटसेवा १ ऑक्टोबरपासून पुन्हा सुरू करण्यात आली आहे. समुद्र आणि हवामान प्रवासी वाहतुकीसाठी अनुकूल झाल्याने जलमार्ग पुन्हा खुला करण्यात आला आहे.

दरवर्षी पावसाळ्याच्या काळात भाऊचा धक्का-रेवस मार्गावरील सेवा थांबवण्यात येते. या मार्गावर पुन्हा प्रवासी वाहतूक सुरू झाल्याने मुंबईहून अलिबाग आणि कोकणाच्या दिशेने जाणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

## निवडक

### पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांकडून कॅप्टन स्मित यांचे कौतुक



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुबईहून तेल अवीव जाणाऱ्या फ्लाईदुबईच्या विमानात १८० प्रवाशांचे प्राण वाचवणारे भारतीय वैमानिक कॅप्टन स्मित मच्छार यांचे जाहीर कौतुक केले आहे. या विमानामध्ये सह-वैमानिकाने (को-पायलट) विमान पाडण्याचा प्रयत्न केला होता. यावेळी स्वतः गंभीर जखमी होऊनही कॅ. स्मित यांनी दाखवलेल्या धैर्यामुळे ९/११सारखा मोठा हल्ला टळला आणि शेकडो प्रवाशांचे प्राण वाचले. याबद्दल इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनीही त्यांना 'हीरो' म्हटले आहे.

## विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या युगात विविध क्षेत्रांचा अनुभव घ्यावा -लोकनेते रामशेठ ठाकूर



**उरण : रामप्रहर वृत्त**

कर्मवीर अण्णांनी दिलेला शिक्षण आणि संस्कारांचा आदर्श आपल्याला पुढे घेऊन जाणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आजचे युग हे स्पर्धेचे युग असल्याने विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षेतील गुणांवर अवलंबून न राहता इतर सर्व क्षेत्रांतही विविध अनुभव घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जासई (ता. उरण) येथे केले.

संस्थेच्या जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनियर कॉलेजमध्ये पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३९वी जयंती बुधवारी उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत होते.

या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य डी.बी. पाटील, शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष सुरेश पाटील, चेअरमन अरुण जगे, व्हाईस चेअरमन डी.आर. ठाकूर, नूरा शेख, डी.बी. म्हात्रे, अमृत ठाकूर, रघुनाथ ठाकूर, गोपीनाथ ठाकूर, वीणा घरत, जयश्री घरत, मधुकर पाटील, प्रा.एस.बी. गाताडी, डी.आर. वर्तक, पर्यवेक्षिका के.एस. मुकादम यांच्यासह पालक-शिक्षक संघ आणि माजी विद्यार्थी संघाचे प्रतिनिधी, ग्रामस्थ उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## पनवेल महापालिकेचा वर्धापन दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेचा १०वा वर्धापन दिन गुरुवारी (दि. १) उत्साहात साजरा झाला. यानिमित्ताने पालिकेच्या चारही प्रभाग समित्यांमध्ये (खारघर, कामोठे, कळंबोली आणि पनवेल) विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



प्रभाग समिती 'ड' (पनवेल) येथे माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, महापालिका सदस्य व अधिकारी उपस्थित होते. यावेळी सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रूपाली माने यांनी पालिकेच्या प्रगतीचा आलेख आणि दैनंदिन कामकाजाचा आढावा मांडला. **(पान २ वर..)**






# जलव्यवस्थापनातून पूर आणि दुष्काळावर उपाय करावा -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील काही भागांना वारंवार पूरस्थितीचा सामना करावा लागतो, तर दुसऱ्या बाजूला अनेक भागांमध्ये पाण्याची टंचाई जाणवते. त्यामुळे अतिरिक्त पाण्याचे योग्य नियोजन करून त्याचा दुष्काळग्रस्त भागांसाठी उपयोग करण्याची गरज आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पूरस्थितीत उपलब्ध होणारे अतिरिक्त पाणी जलाशयांमध्ये वळविणे, नदीजोड प्रकल्प तसेच सिंचनाच्या माध्यमातून त्याचा उपयोग करणे यासाठी विविध उपाययोजनांवर काम सुरू आहे. या प्रकल्पांची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असून, दीर्घकालीन जलव्यवस्थापनातून महाराष्ट्रातील दुष्काळाची समस्या कमी करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले




'पाञ्चजन्य'च्या वतीने मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या 'सुशासन संवाद : मुंबई संकल्प' या कार्यक्रमात पाञ्चजन्यचे संपादक हितेश शंकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विशेष मुलाखत घेतली. यावेळी महाराष्ट्रासह देशातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरण, कृषी, रोजगार आणि विकासाशी संबंधित विविध विषयांवर मुख्यमंत्र्यांनी मनमोकळा संवाद साधला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले बदलत्या हवामानाचे परिणाम गेल्या काही वर्षांत अधिक प्रकर्षाने जाणवत आहेत. त्यामुळे पर्यावरण संवर्धन आणि प्रदूषण नियंत्रणासाठी राज्य शासनासोबतच समाजातील प्रत्येक घटकाने योगदान देणे आवश्यक आहे.ऊर्जा क्षेत्रात स्वच्छ आणि नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढविण्यावर शासनाचा भर आहे. सौरऊर्जेच्या माध्यमातून वीजनिर्मितीचा वाटा वाढविण्याचे नियोजन करण्यात येत आहे. हवामान बदलाचे परिणाम आणि प्रदूषण रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना केल्यास पर्यावरणाशी संबंधित अनेक समस्या दूर करता येतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्रातील पाण्याची उपलब्धता आणि भौगोलिक स्थिती यामध्ये असलेला असमतोल दूर करण्यासाठी दीर्घकालीन जलव्यवस्थापनावर भर देण्यात येत आहे. उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करून दुष्काळग्रस्त भागांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी विविध प्रकल्पांचे नियोजन करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.विदर्भातील वैनगंगा नदीचे समुद्राकडे वाहून जाणारे पाणी जलव्यवस्थापनाच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त भागांकडे वळविण्याच्या दृष्टीने वैनगंगानळगंगा नदीजोड प्रकल्पाचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे बुलढाणा तसेच विदर्भातील दुष्काळग्रस्त भागांना पाणी उपलब्ध होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

पश्चिम घाटातून पश्चिमवाहिनी नद्यांद्वारे समुद्रात जाणाऱ्या पाण्याचा अधिक प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीनेही नियोजन करण्यात येत आहे. अतिरिक्त पाणी दुष्काळग्रस्त भागांकडे वळवून सिंचन आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे. असेही त्यांनी सांगितले

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एन. एच. (नाना)पालकर लिखित 'मॅन ऑफ दि मिलेनिया डॉ. हेडगेवार' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## मुंबई–पुणे एक्स्प्रेस वेवर अपघात; ट्रेलरच्या धडकेत एक जण गंभीर

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे एक्सप्रेसवेवर किलोमीटर ३९ जवळ,ढेकू गावच्या हद्दीत दोन ट्रेलरमध्ये झालेल्या भीषण अपघातात एक व्यक्ती गंभीररीत्या जखमी झाली आहे. या अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीचा पाय फ्रॅक्चर झाला असून, त्याला तत्काळ उपचारासाठी खोपोली येथील नगरपालिकेच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

सदरचा अपघात सायंकाळी साडेचारच्या दरम्यान घडला.एक्सप्रेसवेवरील किलोमीटर ३९ जवळ दोन अवजड ट्रेलर एकमेकांना धडकले. हा अपघात इतका भीषण होता की वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस आणि मदत पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली.जखमी व्यक्तीला वाहनातून बाहेर काढून तातडीने खोपोली नगरपालिका रुग्णालयात हलवण्यात आले.

सध्या रुग्णालयात त्याच्यावर वैद्यकीय पथकाकडून उपचार सुरू आहेत. या अपघातामुळे एक्सप्रेसवेवरील वाहतूक काही काळासाठी



विस्कळीत झाली होती, मात्र पोलिसांनी व हेल्प फाउंडेशन नें व मदत यंत्रणांनी अपघातग्रस्त वाहने बाजूला करून रस्ता मोकळा केला आहे. पोलीस या प्रकरणी पुढील तपास करत आहेत.

## पनवेलमध्ये परतीच्या पावसाने त्रेधातिरपीट

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

सध्या परतीचा पाऊस पडत असल्याने त्याचा फटका झाडांना बसत आहे. झाडे कोसळल्याने तालुक्यातील अनेक ठिकाणचा वीजपुरवठा खंडित झाला होता. बुधवारी सायंकाळी मोठ्या प्रमाणात वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. ग्रामीण भागातील आकुर्ली, चिपळेजवळील झाडे रस्त्यावर कोसळली.



त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व अग्निशमनच्या मदतीने रस्त्यालगत पडलेली झाडे बाजूला करण्यात आली, मात्र तोपर्यंत परिसरात वाहतूक कोंडी झाली होती. विजेच्या तारांवर झाडे कोसळल्याने सायंकाळपासून वीजपुरवठा खंडित झाला होता. काही ठिकाणचा वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. परतीच्या पावसाने नागरिकांची तेधातिरपीट उडाल्याचे चित्र पनवेल तालुक्यात दिसत आहे.

## सर्व मतदान केंद्रांवर आता ३, ४ आणि १०, ११ ऑक्टोबरला विशेष मतदार नोंदणी शिबिरे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण राज्यात सुरू असलेल्या विशेष मतदार यादी तपासणी कार्यक्रमांतर्गत नागरिकांना व नव मतदारांना नाव नोंदणीसाठी अतिरिक्त संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. दावे व हरकती सादर करण्यासाठी आयोगाने १२ ऑक्टोबर २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली असून, या पार्श्वभूमीवर ३, ४ आणि १०, ११ ऑक्टोबर २०२६ रोजी सर्व मतदान केंद्रांवर पुन्हा विशेष मतदार नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

यापूर्वी मागील महिन्यातही मतदान केंद्रांवर विशेष शिबिरे पार पडली होती. मात्र जास्तीत जास्त नागरिकांना व नव मतदारांना मतदार यादीत नाव नोंदवता यावे, यासाठी निवडणूक आयोगाने १२ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. या मुदतवाढीचा विचार करून आता ३, ४, १० आणि ११ ऑक्टोबर या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत सर्व मतदान केंद्रांवर विशेष शिबिरे घेतली जाणार आहेत.

नवीन मतदार नोंदणीः पात्र असूनही मतदार यादीत नाव नसलेल्या नव मतदारांना नाव नोंदवण्याची संधी (नमुना ६). नाव वगळणेः मतदार यादीतून नाव कमी करण्यासाठी अर्ज (नमुना ७). माहिती दुरुस्ती व स्थलांतरः नाव, पत्ता, वय किंवा इतर तपशीलात दुरुस्ती करण्यासाठी किंवा पत्ता बदलण्यासाठी अर्ज (नमुना ८). या शिबिरांच्या दिवशी संबंधित मतदान केंद्रांवर बूथ लेव्हल अधिकारी (BLO) उपस्थित राहून नागरिकांना आवश्यक ते मार्गदर्शन करतील. सर्व पात्र नागरिकांनी व विशेषतः नव मतदारांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह आपल्या संबंधित मतदान केंद्रावर उपस्थित राहून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एमएनएम विद्यालय व टीएनजी कनिष्ठ विज्ञान विद्यालय, गव्हाण–कोपर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे सादर केली.

देशभक्तीपर गीत व नृत्याच्या सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी राष्ट्रप्रेमाची भावना व्यक्त केली. गांधीजी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्यावर प्रश्नमंजुषेचे



आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास प्राचार्य सायली वडवलकर, पर्यवेक्षक अरुण जोशी यांची उपस्थिती होती. प्राचार्या वडवलकर यांनी विद्यार्थ्यांना महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा व स्वच्छतेच्या विचारांचे तसेच लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, प्रामाणिकपणा व कर्तव्यनिष्ठेचे महत्त्व सांगितले.



**मुंबई : माजी मुख्यमंत्री, खासदार नारायण राणे यांची भाजप नेते पंकज तांबे यांनी नरिमन पॉईंट, येथील कार्यालयात भेट घेऊन तालुक्यातील विकास कामासह पक्षविस्तारा बाबत चर्चा करून मार्गदर्शन घेतले. यावेळी सोबत माजी आमदार शाम सावंत उपस्थित होते.**

## खासदार तटकरे उद्या करणार नागोठणे फिल्टर प्लॅन्टची पाहणी; अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याचे निर्देश



**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे शहरातील नागरिकांना गेल्या काही दिवसांपासून भेडसावत असलेल्या मातीमिश्रित व अशुद्ध पाणीपुरवठ्याच्या गंभीर समस्येची दखल घेत नागोठणे गावातील प्रमुख मंडळी, ग्रामपंचायत पदाधिकारी तसेच स्थानिक नेत्यांनी गुरुवार दि. १ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अलिबाग येथील सभागृहात रायगडचे खासदार सुनील तटकरे यांची भेट घेतल्यानंतर नागोठणेकरांना भेडसावत असलेली अशुद्ध पाणीपुरवठ्याची समस्या त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली.

यावेळी खासदार सुनील तटकरे यांच्या समवेत अतिरिक्त जिल्हाधिकारी सचिन ढोले, रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मधुकरशेठ पाटील, राष्ट्रवादीचे नेते भाईसाहेब टके, किशोरभाई जैन, नागोठणे सरपंच सुप्रिया महाडिक, उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे, माजी सरपंच विलास चौलकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे शहर अध्यक्ष बाळासाहेब टके यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठण्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नागोठणे शुद्ध पाणीपुरवठा योजनेसंदर्भात खासदार सुनील तटकरे यांनी यावेळी सविस्तर माहिती घेतली. राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत नागोठण्यात यापूर्वी झालेल्या कामाची सद्यस्थिती, योजनेवर झालेला खर्च तसेच योजना आजतागायत कार्यान्वित का झाली नाही, याबाबत माहिती घेऊन या संपूर्ण प्रकरणाचा परिपूर्ण अभ्यास करून शनिवार दि. ३ ऑक्टोबर रोजी नागोठणे येथील फिल्टर प्लॅन्टला स्वतः भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी करण्यात येईल आणि या गंभीर प्रश्नावर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन खासदार तटकरे यांनी नागोठणेकरांना दिले.

विशेष म्हणजे, नागोठणे शुद्ध पाणीपुरवठा योजनेसंदर्भातील सर्व संबंधित शासकीय अधिकारी व विभागांच्या प्रतिनिधींनी शनिवारच्या पाहणीवेळी नागोठणे फिल्टर प्लॅन्टच्या ठिकाणी उपस्थित राहावे, असे आदेशही दिले आहेत.

पान १ वरुन

## विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या युगात विविध क्षेत्रांचा अनुभव घ्यावा –लोकनेते रामशेठ ठाकूर

यावेळी निवृत्त शिक्षक सागर रंधवे यांनी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले, तर विद्यालयाचे मुख्याध्यापक व्ही. के. कुटे यांनी प्रास्ताविक सादर केले. कार्यक्रमादरम्यान ज्युनियर कॉलेजच्या स्कूल कमिटीवर सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल संतोष घरत, विनायक घरत आणि गोपीनाथ म्हात्रे यांचा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला तसेच प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यालयातील गुणवंत शिक्षक व विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

## पनवेल महापालिकेचा वर्धापन दिन उत्साहात

प्रभाग समिती 'क' (कामोठे) कार्यालयात सभापती रवींद्र जोशी आणि सदस्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला. यावेळी सभापतींनी प्रभागात सुरू असलेल्या विकासकामांची माहिती देऊन नागरिकांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

प्रभाग समिती 'ब' (कळंबोली) येथे सभापती मधु पाटील आणि पालिका सदस्यांच्या प्रमुख उपस्थितीत सोहळा पार पडला. प्रभाग कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. यावेळी प्रभागातील विविध विकासकामांचा आढावा घेऊन उपस्थितांनी नागरिकांना शुभेच्छा दिल्या. प्रभाग समिती 'अ' (खारघर) कार्यालयात सभापती रवींद्र भगत यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित महापालिका सदस्यांनी प्रभागातील प्रगतिपथावरील कामांची माहिती देत नागरिकांना शुभेच्छा दिल्या तसेच कार्यक्रमास उपस्थित कर्मचारी आणि अभ्यागतांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

## महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांनी घेतला किनारी सुरक्षेचा आढावा

**मुरुड : प्रतिनिधी**

भारतीय तटरक्षक दलाने ३० सप्टेंबर ते ०१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत महाराष्ट्र आणि गोव्याच्या किनारपट्टीवर 'सागर कवच–०२/२६' या संयुक्त किनारी सुरक्षा सरावाचे यशस्वी आयोजन केले. या दोन दिवसांच्या सरावाने या भागातील किनारी सुरक्षा व्यवस्थेची काटेकोर चाचणी घेतली आणि सागरी आपत्कालीन परिस्थितींविरुद्ध बहु–संस्थांच्या सज्जतेचे मूल्यांकन केले. या सरावात ४,८०० हून अधिक भागधारकांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

०१ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्राचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह मुंबईतील गिरगाव चौपाटी येथे सरावाच्या प्रगतीचा आढावा घेतला. या उच्चस्तरीय आढाव्यात राष्ट्रीय सुरक्षा रक्षक , आणि तटरक्षक दलाच्या 'रॅपिड रिॲक्शन टीम'चे संयुक्त प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. संभाव्य असमान धोक्यांपासून महत्त्वपूर्ण किनारी प्रतिष्ठानांचे रक्षण करण्यासाठी आवश्यक असणारा समन्वय आणि




जलद प्रतिसाद क्षमतेचे मूल्यांकन करण्याच्या उद्देशाने यानंतर किनारी पाळत ठेवणारी विशेष हवाई मोहीम राबवण्यात आली. किनारी सुरक्षा व्यवस्थेचे मूल्यांकन करण्यासाठी, या सरावादरम्यान मुरुड जंजिरा , रेवदंडा,पालघर, अलिबाग, गोवा आणि विविध लँडिंग पॉईंट्ससह संवेदनशील ठिकाणी समन्वित हल्ले आणि घुसखोरीचे कृत्रिम प्रसंग निर्माण करण्यात आले.

महत्त्वपूर्ण सागरी पायाभूत सुविधांवरील संभाव्य शत्रू कारवाया निष्प्रभ करण्यासाठी माझगाव डॉकयार्ड लिमिटेड येथे एनएसजीच्या सामरिक पथकाने आणि तटरक्षक दलाच्या आरआरटीने केलेली विशेष संयुक्त सामरिक सराव मोहीम हे या सरावाचे प्रमुख आकर्षण होते. प्रस्थापित किनारी सुरक्षा आराखड्यावर आधारित या सरावासाठी सागरी आणि हवाई साधनांची सर्वसमावेशक तैनाती करण्यात आली. या सामरिक तैनातीमध्ये तटरक्षक दल/भारतीय नौदलाची जहाजे, डॉर्नियर विमाने, हेलिकॉप्टर आणि एअर कुशन वाहने ,होव्हरक्राफ्ट यांचा समावेश होता. एकसंध आणि बहुस्तरीय किनारी सुरक्षा जाळे सुनिश्चित करण्यासाठी, या सरावाने भारतीय नौदल, राज्य पोलीस, एनएसजी, गुप्तचर यंत्रणा, सीमाशुल्क , सीआयएसएफ, एनसीसी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड , महसूल गुप्तचर संचालनालय , मत्स्यव्यवसाय विभाग, महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथक , एनसीबी आणि एसआयबी यासह विविध सहभागी संस्थांची संसाधने आणि मनुष्यबळ यशस्वीरीत्या एकत्र आणले.

या सखोल घुसखोरी–सदृश सरावांद्वारे सुरक्षा दलांनी त्यांच्या मानक कार्यप्रणाली , दळणवळण जाळे आणि आंतर–संस्था समन्वयाची प्रभावीपणे पडताळणी केली. 'सागर कवच–०२/२६' ची यशस्वी अंमलबजावणी पश्चिम किनारपट्टीवर एक मजबूत आणि अभेद्य सुरक्षा कवच राखण्यासाठी सागरी सुरक्षा यंत्रणांच्या दृढ वचनबद्धतेची पुन्हा एकदा पुष्टी करण्यात आली आहे.

# पनवेल मनपाने अधिकाधिक लोकाभिमुख कारभार करावा -महापौर नितीन पाटील

## पालिकेचा वर्धापन दिन तथा दशकपूर्ती महोत्सव उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेने अधिकाधिक लोकाभिमुख कारभार करावा, ज्यायोगे नागरिकांना अधिकाधिक सोयीसुविधा व समाधान मिळेल, असे प्रतिपादन महापौर नितीन पाटील यांनी गुरुवारी (दि. १) येथे केले. महापालिकेच्या वर्धापन दिन तथा दशकपूर्ती महोत्सवाच्या प्रारंभानिमित्त मुख्यालयात आयोजित स्नेहसंवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आयुक्त मंगेश चितळे, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, नगरसेवक तसेच अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे आदी उपस्थित होते.

यावेळी महापौरांनी महापालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांना शुभेच्छा दिल्या तसेच पनवेल नगरपरिषदेचे पनवेल महानगरपालिकेत रूपांतर होण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी जे अथक प्रयत्न केले त्यांचा उल्लेख करून आमदारांचे आभार मानले. महानगरपालिकेत आल्यानंतर अभ्यागतांना ही पालिका आपली वाटेल व त्यांचे काम सहजतेने होईल याकडे प्रशासनाने अधिक लक्ष द्यावे, असे सांगितले. अधिकारी व पदाधिकारी यांच्यात सुसंवाद असेल तर कामे लवकर होऊन नागरिकांना याचा लाभ होऊन लोकाभिमुख कारभार होईल, असेही त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले.

यावेळी आयुक्त मंगेश चितळे यांनी महापालिकेच्या विविध विभागांनी १० वर्षांत केलेल्या व सुरू असलेल्या कामांची सविस्तर माहिती दिली. महापालिका आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेच, परंतु पुढील काळात अधिक सक्षम होण्याच्या दृष्टीने प्रयत्न वाढवावे लागतील, असे त्यांनी सांगितले. महापालिकेपुढे अनेक आव्हाने आहेत. पदाधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांनी एकत्रितपणे काम केल्यास महापालिका प्रगतीच्या शिखरापर्यंत पोहचेल, असेही त्यांनी सांगितले. यावेळी सभागृहनेते प्रकाश बिनेदार यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयुक्त गणेश देशमुख यांच्या कार्यकाळात महापालिकेच्या विकासकामांची खरी सुरुवात झाल्याचे सांगितले. सर्व घटकांना न्याय मिळावा, गरजवंतांना तातडीने मदत महापालिकेने करावी यादृष्टीने सर्वांनी काम केले पाहिजे. पनवेल महानगरपालिका ज्या पद्धतीने काम करते त्या कार्यशैलीची उदाहरणे इतर महापालिकांमध्ये दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

वर्धापन दिनाचे औचित्य साधून महानगरपालिका अंतर्गत रमाई आवास घरकुल योजनेचा लाभ मिळालेल्या सुंदराबाई जाधव, केतन जाधव, गोविंद गायकवाड व रघुनाथ जाधव या चार लाभार्थ्यांना प्रत्येकी एक लाख २५ हजार रुपये मान्यवरांच्या हस्ते धनादेशाद्वारे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना परिवहन उपायुक्त कैलास गावडे यांनी, तर आभार उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी मानले. सूत्रसंचालन मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर यांनी केले.

यावेळी महापालिका सदस्य मनोज भुजबळ, दर्शना भोईर, प्रिती जॉर्ज, रुचिता लोंढे, प्रियंका कांडपिळे, डॉ. अस्मिता घरत तसेच उपायुक्त डॉ. वैभव विधाते, स्वरूप खारगे, अभिषेक पराडकर, रविकिरण घोडके, मंगला माळवे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, शहर अभियंता राजेश कर्डिले, सहायक आयुक्त बाळाराम रातांबे, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. भगवान गीते, डॉ. मधुलिका लाड, अधीक्षक प्रकाश गायकवाड, कीर्ती महाजन, घनकचरा विभागप्रमुख अनिल कोकरे, कनिष्ठ अभियंता प्रितम पाटील तसेच महापालिका अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. पनवेल महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त महापालिका मुख्यालय व चारही प्रभाग समिती कार्यालयांत येणाऱ्या सर्व अभ्यागतांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.






**पनवेल : जासईत गौरी-गणपती उत्सव उत्साहात साजरा झाला. उत्सवाचे औचित्य साधून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ठिकठिकाणी विराजमान गौरी-गणपती तसेच विविध घरगुती व सार्वजनिक बाप्पाच्या मंडपांना भेटी देत नागरिकांना उत्सव पर्वाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी कामगार नेते सुरेश पाटील, रमेश म्हात्रे, हरिश्चंद्रशेठ पाटील, शिरीष म्हात्रे, जासई विभाग अध्यक्ष गोपीनाथ म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य अनंत म्हात्रे, नूरा शेख, मुख्याध्यापक खुटे सर, अनुप पाटील, राजेंद्र पाटील, अमृत ठाकूर, महादेव म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.**

## खारघरमध्ये ध्वनिप्रदूषण करणाऱ्यांवर वाहतूक पोलिसांचा बडगा

**पनवेल : वार्ताहर**

बुलेट आणि स्पोर्ट्स बाईकला मॉडिफाइड सायलेन्सर बसवून कर्कश आवाज करणाऱ्या चालकांविरोधात नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेंतर्गत खारघर वाहतूक शाखेने आतापर्यंत ६१ दुचाकींवर कारवाई केली आहे. वाहतूक पोलीस उपायुक्त राहुल खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुलफरोज मुजावर यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली.

अनेक दुचाकीस्वार कंपनीने बसवलेला मूळ सायलेन्सर काढून त्याऐवजी मोठ्या आवाजाचे मॉडिफाइड सायलेन्सर बसवत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे कर्कश आवाजामुळे नागरिकांना त्रास होत असल्याने वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला.विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, रुग्ण आणि विद्यार्थ्यांना अशा कर्कश आवाजाचा त्रास सहन करावा लागतो. तसेच रात्री-अपरात्री होणाऱ्या मोठ्या आवाजामुळे ध्वनीप्रदूषणात वाढ होत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी वाहतूक शाखेकडे प्राप्त झाल्या होत्या.

या पार्श्वभूमीवर खारघर वाहतूक शाखेने विशेष मोहीम राबवून ६१ मॉडिफाइड सायलेन्सर असलेल्या बुलेट व स्पोर्ट्स बाईकवर दंडात्मक कारवाई केली. कारवाई करण्यात आलेली वाहने वाहतूक शाखेत जमा करण्यात आली होती. मॉडिफाइड सायलेन्सर लावून कर्कश आवाज करणाऱ्या वाहनांवर यापुढेही कडक कारवाई सुरू राहणार असून नागरिकांनी अशा वाहनांची माहिती वाहतूक पोलिसांना द्यावी, असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुलफरोज मुजावर यांनी केले आहे.

## खांदेश्वर स्टेशन परिसरात स्वच्छता अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत सरकारच्या 'स्वच्छता ही सेवा २०२६ स्वच्छ भारत, विकसित भारत' अभियानांतर्गत पनवेल महापालिकेच्या वतीने खांदेश्वर रेल्वे स्टेशन परिसरात 'एक दिवस, एक तास, एक साथ' या विशेष संकल्पनेनुसार स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. या मोहिमेत लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्वतः हातात झाडू घेऊन प्रत्यक्ष स्वच्छता करीत नागरिकांसमोर नवा आदर्श निर्माण केला.

स्वच्छता मोहिमेत महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिलाताई पाटील, महापालिका आयुक्त मंगेश चितळे, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, प्रभाग समिती सभापती रवी जोशी, नगरसेवक प्रदीप भगत, डॉ. अरुणकुमार भगत, नगरसेविका हेमलता गोवारी, शीला भगत व उपायुक्त वैभव विधाते सहभागी झाले होते.

दरम्यान, सर्वांनी खांदेश्वर रेल्वे स्टेशन आणि परिसरातील कचऱ्याची विल्हेवाट लावत परिसर चकाचक केला. स्वच्छ पनवेल, सुंदर पनवेल संकल्पनेला अधिक बळ देण्यासाठी केवळ पालिका प्रशासनावर अवलंबून न राहता नागरिकांनीही आपल्या दैनंदिन जीवनात स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन यावेळी उपस्थितांनी केले.








**पनवेल : महापालिकेचे माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी परिसरातील गौरा-गणपतींचे दर्शन घेतले. यावेळी त्यांचे स्वागत व सन्मान करण्यात आला. सोबत नगरसेवक दशरथ म्हात्रे, पदाधिकारी, कार्यकर्ते.**

## लहान मुलांसाठी डेंटल कॅम्प

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

किडझोनिया इंटरनॅशनल प्री-स्कूल, पनवेल येथे युनिक डेंटल क्लिनिक, पनवेल यांच्या सहकार्याने डेंटल कॅम्प २०२६ आयोजित करण्यात आला. हा कॅम्प युनिक डेंटल क्लिनिकच्या संस्थापक व दंतचिकित्सक डॉ. उष्णा युनूस शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.



या कॅम्पचा मुख्य उद्देश लहान मुलांमध्ये लहान वयातच तोंडाच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे आणि प्रतिबंधात्मक दंत काळजीला प्रोत्साहन देणे हा होता. या उपक्रमात ३ ते ६ वयोगटातील एकूण ४० मुलांनी सहभाग घेतला. १ ते २ वर्षे वयोगटातील डे केअरमधील मुलांनी पालकांसोबत सहभाग नोंदवला. मुलांची क्लिनिकल दंत तपासणी व तोंडाच्या आरोग्याचे मूल्यमापन करण्यात आले. पालकांना तोंडाची स्वच्छता राखण्याचे उपाय, प्रतिबंधात्मक काळजी व लहान वयापासून दंत तपासणीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. उपक्रमाचा उद्देश मुलांच्या वाढीत चांगल्या दंत सवयी विकसित करणे व मुलांबरोबरच पालकांमध्येही जागरूकता निर्माण करणे हा होता.

## प्रांजल कजबजेची कॅरम स्पर्धेत चमकदार कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**




जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एमएनएम विद्यालय व टीएनजी कनिष्ठ विज्ञान विद्यालय, गव्हाण-कोपर येथील सहावीची विद्यार्थिनी प्रांजल कजबजेने तालुकास्तरीय कॅरम स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करीत पाचवे स्थान पटकावले. ३० सप्टेंबरला डी. डी. विसपुते स्कूल, नवीन पनवेल येथे तालुकास्तरीय कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. १४ वर्षांखालील मुलींच्या गटात प्रांजलने उत्कृष्ट खेळ करत पाचवे स्थान मिळवले. तिची जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेसाठी निवड झाली. याबद्दल प्राचार्या वडवलकर, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## 'सीकेटी'त पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण अकादमीचा प्रारंभ

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नवीन पनवेल येथील सी. डी. देशमुख स्पर्धा परीक्षा केंद्रांतर्गत 'महाराष्ट्र पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण अकादमी' या विशेष प्रशिक्षण बॅचचे आयोजन करण्यात आले आहे. ५ ऑक्टोबरपासून विशेष बॅच सुरू होत असून नोंदणी प्रक्रिया सीकेटी महाविद्यालयात सुरू आहे. नियमित शिक्षणासोबतच पोलीस भरतीची तयारी करणारे चांगू काना ठाकूर महाविद्यालय हे एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरत आहे.

उमेदवारांना मैदानी चाचणी व लेखी परीक्षेची परिपूर्ण तयारी एकाच छताखाली करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. प्रशिक्षणात रोज संध्याकाळी तज्ज्ञ प्रशिक्षकांद्वारे मैदानावर मैदानी चाचणीसाठी सराव घेतला जाणार आहे. लेखी परीक्षेसाठी गणित, बुद्धिमत्ता, मराठी व्याकरण व सामान्य ज्ञानाचे वर्ग होणार असून नवीन परीक्षा पद्धतीवर आधारित टेस्ट सीरिज घेतल्या जाणार आहेत.

आजी-माजी पोलीस अधिकारी, नामांकित प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभणार असून समृद्ध वाचनालय, विषयानुरूप स्टडी मटेरियल उपलब्ध करून दिले जाईल. प्रशिक्षणाची वेळ दुपारी ३ ते ७ असेल. अधिक माहितीसाठी स्पर्धा परीक्षा कक्ष, रूम नं. १२, चांगू काना ठाकूर महाविद्यालय परिसर, प्लॉट नं. १, सेक्टर ११, नवीन पनवेल येथे संपर्क साधावा. समन्वयक दत्तात्रय तोंडे (८९९९३३१६०२) यांच्याशी संपर्क साधता येईल, अशी माहिती प्राचार्य एस. के. पाटील यांनी दिली.

## मोबाइल चोरीप्रकरणी तरुणाला अटक

**पनवेल** : अशोक बाग, विरूपाक्ष मंदिर परिसरातून मोबाइल चोरी केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी एका २२ वर्षीय तरुणाला अटक केली आहे. विनीत टाक (२२) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अशोक बाग, विरूपाक्ष मंदिराजवळ ही घटना घडली. याप्रकरणी राम माधव सुरूशे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासादरम्यान पोलिसांनी विनीत टाकला अटक केली. त्याच्याकडून १० हजार रुपये किमतीचा मोबाइल जप्त करण्यात आला. जप्त मोबाइलचा आयएमईआय क्रमांक ८६०५५२०८५९६३४३६ असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण, पोलीस नाईक सम्राट डाकी, अनिल चव्हाण तसेच पोलीस कर्मचारी साईनाथ मोकळ, विशाल दुधे, सचिन कोर आणि दत्ता जाधव यांनी केली.

संपादकीय

# भारतीय धैर्याचा गौरव!

फ्लायदुबईच्या तेल अवीवकडे निघालेल्या विमानाच्या कॉकपिटमध्ये बुधवारी जे घडले त्याने आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतुकीसमोरील सुरक्षेच्या नव्या आव्हानांची जाणीव पुन्हा एकदा जगभराला करून दिली आहे.

दुबई ते तेल अवीव असा प्रवास करण्यासाठी उड्डाण केलेल्या फ्लायदुबईच्या विमानात घडलेल्या थरारक घटनेची ब्रेकिंग न्यूज येताच बुधवारी अवघे जग थबकले. विमानातील प्रवाशांनी संबंधित प्रसंगाचे वर्णन मृत्यू समीप असल्याची जाणीव करून देणारा भीषण प्रसंग असे केले आहे. या संकट प्रसंगात भारतीय वैमानिक कॅप्टन स्मित मच्छार यांनी दाखवलेल्या धैर्य आणि प्रसंगावधानाने जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. घटनेनंतर लगेच उपलब्ध झालेल्या माहितीनुसार, फ्लायदुबईच्या संबंधित विमानातील सहवैमानिकाने कॅप्टन मच्छार यांच्यावर कॉकपिटमध्ये हल्ला केला. त्यानंतर विमान अवघ्या काही सेकंदांत सुमारे १७ हजार फूट खाली आले. प्रवाशांनी दिलेल्या माहितीनुसार वेगाने खाली कोसळण्याच्या अनुभवामुळे विमान प्रचंड किंकाळ्यांनी भरून गेले. मात्र, स्वतः गंभीर जखमी होऊनही कॅप्टन मच्छार यांनी कॉकपिटचा दरवाजा उघडण्याची यंत्रणा सक्रिय केली. त्यामुळे प्रवासी आणि विमानातील इतर कर्मचाऱ्यांना आत प्रवेश करून हल्लेखोराला ताब्यात घेणे शक्य झाले. विमानातील अतिरिक्त वैमानिकांच्या मदतीने अखेर विमान सौदी अरेबियातील तबुक विमानतळावर सुरक्षित उतरवण्यात आले. या घटनेने केवळ विमानातील १७४ प्रवाशांचे जीव धोक्यात घातले नाहीत, तर आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतुकीसमोरील सुरक्षेच्या नव्या आव्हानांची जाणीवही जगभराला करून दिली. मच्छार यांच्यावर उपचार झाले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी मच्छार यांना 'खरा नायक' संबोधले आहे. संकटग्रस्त विमानात १६८ प्रवासी इस्रायली होते. नेतान्याहू यांनी ही घटना ९/११च्या दहशतवादी हल्ल्यासमान असल्याचे म्हटले आहे. ९/११ च्या घटनेत विमानांचे अपहरण करून अमेरिकेत दहशतवादी हल्ला केला गेला होता. अर्थात फ्लायदुबईच्या घटनेमागे दहशतवादी हेतू होता की नाही हे अद्याप तपासातून निश्चित व्हायचे आहे. परंतु दहशतवाद किती निरनिराळ्या स्वरुपात अवतरू शकतो याची सुन्न करणारी जाणीव बुधवारी जगभराला पुन्हा झाली. संयुक्त अरब अमिरातीने या घटनेचा विशेष तपास सुरू केला असून त्यात दहशतवादी संबंध, पूर्वनियोजन किंवा अन्य हेतूंचाही तपास केला जात आहे. भारत सरकारकडूनही या घटनेकडे अत्यंत गांभीर्याने पाहिले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कॅप्टन मच्छार यांना 'हिरो' संबोधत त्यांच्या धैर्याचे कौतुक केले. अत्यंत गंभीर संकटात आणि स्वतः गंभीर जखमी असूनही कॅप्टन मच्छार यांनी इतरांचे प्राण वाचवण्याचे अपार धैर्य दाखवले अशा शब्दांत पंतप्रधानांनी त्यांचा गौरव केला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही मच्छार यांना 'हिरो' म्हटले आहे, तर इस्रायलमध्ये विमानातील प्रवाशांच्या धाडसाचेही कौतुक झाले. तपास पूर्ण होऊन घटनेसंबंधीचे अंतिम निष्कर्ष हाती येणे अद्याप बाकी आहे. मात्र कॉकपिट सुरक्षा, वैमानिकांची पार्श्वभूमी तपासणी, मानसिक व सुरक्षा मूल्यांकन, विमानातील आपत्कालीन प्रक्रिया आणि आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांमधील सुरक्षा समन्वय यांचा पुन्हा सखोल आढावा घेण्याची गरज अधोरेखित झाली आहे. फ्लायदुबईने इस्रायलसाठीची उड्डाणे तात्पुरती स्थगित केल्याचेही वृत्त आहे. या घटनेचे सर्व पैलू अद्याप उलगडायचे असले तरी एका भारतीय वैमानिकाच्या धैर्याने शेकडो जीव वाचवले आणि संकटकाळात 'कर्तव्य' म्हणजे नेमके काय याचा असामान्य आदर्श जगासमोर ठेवला आहे.

# चारा टंचाईवर दीर्घकालीन उपायांची हमी



राज्यातील पशुपालक आणि शेतकऱ्यांसाठी वैरण विकास कार्यक्रम हा केवळ चारा उपलब्धतेचा प्रश्न सोडविणारा उपक्रम न ठरता पशुपालन अर्थव्यवस्थेला स्थैर्य देणारे महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. स्थानिक पातळीवर वर्षभर पुरेसा आणि पौष्टिक चारा उपलब्ध करण्यावर भर दिल्यास पशुपालकांचे बाहेरील चाऱ्यावरील अवलंबित्व कमी होऊ शकते. शासकीय पडीक, गायरान तसेच उपलब्ध जमिनींचा नियोजनबद्ध वापर करून चारा उत्पादन वाढविणे, सुधारित चारा वाणांना प्रोत्साहन देणे आणि वैरणीच्या झाडांची लागवड वाढविणे यामुळे पशुधनासाठी सातत्यपूर्ण खाद्यसुरक्षा निर्माण होण्यास मदत होईल. त्यातून पशुधनाचे आरोग्य व उत्पादकता टिकून राहण्याबरोबरच दुग्ध व्यवसायाचा खर्च नियंत्रित करण्यास हातभार लागू शकतो.

विशेषतः दुष्काळ आणि पावसाच्या अनिश्चिततेच्या काळात चारा टंचाईवर तात्पुरती उपाययोजना करण्याऐवजी दीर्घकालीन व्यवस्था उभारणे, हे या कार्यक्रमाचे सर्वाधिक महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते. पशुपालन व्यवसायासाठी चारा ही जीवनरेखा आहे. राज्यातील हिरव्या व सुक्या चाऱ्यातील तूट भरून काढण्यासाठी राज्य सरकारने प्रथमच 'वैरण विकास धोरण' लागू करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. दुष्काळी भागात तातडीने चारा उपलब्ध करून देण्याबरोबरच राज्यासाठी दीर्घकालीन चारा सुरक्षा निर्माण करण्याच्या दुहेरी उद्देशाने हे धोरण जाहीर केले आहे. राज्यातील सुमारे २ कोटी ७८ लाख पशुधनासाठी हिरवा आणि सुका चारा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्यासाठी चारा लागवडीचे क्षेत्र वाढविणे, उपलब्ध चाऱ्याची गुणवत्ता सुधारणे, त्याची योग्य पद्धतीने साठवणूक करणे आणि पर्यायी चारा संसाधनांना चालना देणे, अशा व्यापक उपाययोजनांचा धोरणात समावेश करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी ४९६ कोटी रुपयांच्या आर्थिक तरतुदीचे नियोजन असून वार्षिक १२ हजार लाभार्थ्यांना रोजगार उपलब्ध होणे अपेक्षित आहे.२०२६ च्या खरीप हंगामात 'ट्रिगर-१' लागू झालेल्या तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीवरील उपाययोजनांसाठी २५ सप्टेंबर २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यामध्ये जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजनेचाही समावेश आहे.

राज्यातील पशुधन संख्या, उपलब्ध चारा आणि चाऱ्याची तूट विचारात घेऊन उपाययोजना सुचविण्यासाठी २० नोव्हेंबर २०२३ च्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरीय कृती दल स्थापन करण्यात आले होते. या कृती दलाने चारा टंचाई दूर करण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांची शिफारस केली आहे.राज्यात सुमारे २ कोटी ७८ लाख पशुधन आहे. या पशुधनासाठी १ हजार १७६.७८ लाख मेट्रिक टन हिरव्या चाऱ्याची गरज असताना ९०७.४९ लाख मेट्रिक टन चारा उपलब्ध आहे. हिरव्या चाऱ्याची तूट २६८.३७ लाख मेट्रिक टन म्हणजेच २२.७९ टक्के आहे. सुक्या चाऱ्याची गरज ३७७.८७ लाख मेट्रिक टन असून प्रत्यक्ष उपलब्धता २९६.६२ लाख मेट्रिक टन आहे. त्यामुळे सुक्या चाऱ्याची तूट ८१.०६ लाख मेट्रिक टन म्हणजे २१.४३ टक्के आहे. पशुपालन व्यवसायासाठी चारा हा अत्यावश्यक घटक असल्याने ही तूट भरून काढण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपायांची आवश्यकता आहे.चारा लागवडीखालील क्षेत्र वाढविण्यासाठी महसूल आणि वन विभागाच्या शासकीय पडीक, गायरान किंवा मुलकी पड जमिनींचा वापर करण्याचा विचार आहे.

कुरण आणि गायरान जमिनींमध्ये सुधारित गवत तसेच द्विदल चारा पिकांच्या जातींची लागवड केली जाणार आहे. 'हॉर्टी-पाश्चर' पद्धतीत फळबागांमधील दोन झाडांच्या मोकळ्या जागेत चारा वाणांची लागवड करून दुहेरी उत्पादन घेण्यात येणार आहे. 'सिल्वी-पाश्चर' पद्धतीत पडीक, खडकाळ किंवा डोंगराळ जमिनीवर सुबाभूळ, अंजन आणि शेवगा यांसारख्या चारा देणाऱ्या झाडांसोबत बहुवार्षिक गवताची लागवड केली जाईल. शेतातील बांध, बंधारे, तलावांचे बांध, परसबाग, जलमार्ग तसेच नापीक आणि मशागतीस अयोग्य जमिनींचाही चारा उत्पादनासाठी उपयोग केला जाणार आहे. अशा जागांवर गिनी गवत, सिग्नल गवत आणि स्टायलो गवताची लागवड करण्याचा प्रस्ताव आहे.उपलब्ध चाऱ्याचे केवळ प्रमाण वाढविण्याबरोबरच त्याची गुणवत्ता आणि पौष्टिक मूल्य सुधारणे हा धोरणाचा महत्त्वाचा भाग आहे. त्यासाठी मुरघास निर्मिती, चाऱ्यावर युरिया प्रक्रिया, कापूस पिकाच्या टाकाऊ अवशेषांवर ओझोन प्रक्रिया आणि एन्झाइम प्रक्रिया अशा तंत्रांचा वापर केला जाणार आहे. कृषी अवशेष आणि कृषी प्रक्रिया उद्योगांमधील उपपदार्थांचा योग्य वापर करून त्यांचे पौष्टिक खाद्यगट्टे व मुरघासामध्ये रूपांतर करण्यात येईल. यामुळे अन्यथा वाया जाणाऱ्या कृषी अवशेषांचा पशुखाद्यासाठी उपयोग होऊन चारा सुरक्षेला बळकटी मिळणार आहे.

वैरण विकास धोरणानुसार उपलब्ध चारा अधिक काळ टिकवून ठेवण्यासाठी शास्त्रीय साठवणुकीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. त्यासाठी 'हे बेल्स', 'फीड ब्लॉक', 'लीफ मिल' आणि कडबाकुट्टी या पद्धतींचा अवलंब केला जाईल. चाऱ्याची टिकाऊक्षमता वाढल्याने अतिरिक्त उत्पादनाच्या काळात त्याची साठवणूक करून टंचाईच्या काळात गरजू भागांना पुरवठा करणे शक्य होणार आहे. चारा कापणी, प्रक्रिया, वाहतूक आणि जनावरांना चारा देताना होणारा अपव्यय रोखण्यावरही भर दिला जाणार आहे. पारंपरिक चारा पिकांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी अझोला उत्पादन, हायड्रोपोनिक पद्धतीने चारा निर्मिती आणि काटेविरहित निवडुंगाचा चारा म्हणून वापर यांसारख्या पर्यायी चारा संसाधनांना प्रोत्साहन देण्यात येईल.वैरण ग्राहक सेवा केंद्रांची निर्मिती, सार्वजनिक-खासगी भागीदारीतून चारा विकास, चारा विकास विस्तार उपक्रम आणि संस्थात्मक बियाणे साखळी उभारणे या पूरक उपाययोजनांचाही धोरणात विचार करण्यात आला आहे. सद्यस्थितीत जाहीर करण्यात आलेल्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी कमी पाण्यात चारा उत्पादन घेण्यावर अल्पकालीन भर दिला जाणार आहे.

दीर्घकालीन उपायांमधून पशुपालनासाठी पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध करणे, पशुजन्य उत्पादनांमध्ये स्वयंपूर्णता साधणे आणि पशुपालन व्यवसायाला उद्योजकतेचे स्वरूप देण्याचे उद्दिष्ट आहे.'विकसित महाराष्ट्र २०४७' कार्यक्रमामध्ये पीक अवशेष आणि कृषी प्रक्रिया उद्योगांतील उपपदार्थांचा वापर पौष्टिक खाद्यगट्टे व मुरघास निर्मितीसाठी करून चारा सुरक्षा मजबूत करण्याच्या उपाययोजनेचा समावेश आहे. राज्यात पशुपालन व्यवसायामध्ये उद्योजकता निर्माण करण्याच्या व्यापक धोरणातून वार्षिक सुमारे २५ लाख लाभार्थ्यांना लाभ देण्याचे नियोजन असून त्यासाठी अंदाजे चार हजार ५०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद प्रस्तावित आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्र वैरण विकास धोरण जाहीर करण्यात आले असून या निर्णयामुळे पशुधनासाठी आवश्यक चाऱ्याची उपलब्धता अधिक सक्षम होईल तसेच पशुपालन आणि दुग्धव्यवसाय या शेतीपूरक व्यवसायांना भक्कम बळ मिळून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळेल.

**-पंकजा मुंडे, पशुसंवर्धन मंत्री**




## सेल्फीच्या नादात बँक खाते होऊ शकते रिकामे

सायबर फ्रॉडची रोज नवीन प्रकरणं समोर येत आहेत. लोकांची आयुष्यभराची कमाईही लुटली जात आहे.



सायबर गुन्हेगार नवनवीन डावपेच अवलंबत आहेत. आजकाल सेल्फी काढणं हे सामान्य झालं आहे. प्रत्येकाला आपले सुंदर फोटो सोशल मीडियावर शेअर करायचे असतात. पण तुमची ही सवय तुम्हाला मोठ्या संकटात टाकू शकते हे तुम्हाला माहीत आहे का? सायबर गुन्हेगार आता सेल्फीचा वापर करून तुमची पर्सनल आणि बँक अकाऊंटची माहिती चोरू शकतात. यानंतर सायबर अटॅक करून तुमचं बँक अकाऊंट रिकामं केलं जाऊ शकतं.

अनेक ॲप्स आणि वेबसाइट्सवर तुम्हाला तुमच्या ओळखीची पुष्टी करण्यासाठी सेल्फी घेण्यास सांगितलं जातं. याला सेल्फी ऑथेंटिकेशन म्हणतात. हे एक तंत्रज्ञान आहे जे हे सुनिश्चित करतं की, तुम्ही तीच व्यक्ती आहात ज्याची ओळख तुम्हाला सिद्ध करायची आहे. बहुतेक बँका आणि फिनटेक कंपन्या सेल्फीद्वारे लोकांचं व्हेरिफिकेशन करतात, मात्र याच तंत्राचा वापर सायबर गुन्हेगारही करू शकतात, ज्याद्वारे ते तुमचा गैरफायदा घेऊ शकतात.

बँक फ्रॉड : सायबर गुन्हेगार तुमच्या सेल्फीचा वापर करून तुमच्या बँक अकाऊंटमध्ये प्रवेश करू शकतात आणि तुमचे पैसे काढू शकतात. लोन फ्रॉड : हॅकर्स तुमच्या सेल्फीचा वापर करून तुमच्या नकळत तुमच्या नावावर कर्ज घेऊ शकतात. सिमकार्डचं क्लोनिंग : तुमच्या सेल्फीच्या मदतीने सायबर गुन्हेगार तुमचं सिमकार्ड क्लोन करू शकतात, ज्यावरून ते तुमच्या मोबाइल क्रमांकावर आलेला ओटीपी मिळवू शकतात.

असं ठेवा स्वतःला सुरक्षित

अनोळखी लिंकवर क्लिक करू नका. कोणत्याही संशयास्पद लिंक्सपासून लांब राहा. तुमच्या सर्व अकाऊंटसाठी यूनिक आणि स्ट्राँग पासवर्ड तयार करा. सुरक्षा वाढवण्यासाठी टू फॅक्टर ऑथेंटिफिकेशनचा वापर करा. चांगल्या अँटीव्हायरस सॉफ्टवेअरचा वापर करून तुमचा फोन मालवेअरपासून सुरक्षित ठेवा. सोशल मीडियावर तुमची पर्सनल माहिती शेअर करणं टाळा. तुम्ही सायबर फ्रॉडला बळी पडल्याचं तुम्हाला वाटत असल्यास ताबडतोब तुमच्या बँकेशी संपर्क साधा. नेहमी सावध राहा आणि तुमची पर्सनल माहिती कधीही, कोणाशीही शेअर करू नका.

# भारतरत्न लाल बहादूर शास्त्री



निमित्त

लाल बहादूर शास्त्री हे भारताचे दुसरे पंतप्रधान आणि स्वातंत्र्यलढ्यातील निष्ठावान नेते होते. त्यांचा जन्म २ ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मुघलसराय येथे झाला. त्यांचे मूळ आडनाव श्रीवास्तव होते, परंतु जातिभेद नाकारण्यासाठी त्यांनी शास्त्री ही पदवी स्वीकारली. त्यांचे बालपण अत्यंत गरिबीत गेले. वडिलांचे लहानपणीच निधन झाल्यामुळे आईच्या कष्टातून त्यांचे शिक्षण झाले. काशी विद्यापीठातून त्यांनी शास्त्री पदवी मिळवली आणि तेव्हापासून ते लाल बहादूर शास्त्री म्हणून ओळखले जाऊ लागले.

महात्मा गांधींच्या विचारांनी प्रेरित होऊन शास्त्रीजी स्वातंत्र्य चळवळीत सामील झाले. असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग आणि भारत छोडो आंदोलनात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. ब्रिटिश सरकारने त्यांना अनेकदा तुरुंगात टाकले. एकूण नऊ वर्षे त्यांनी कारावास भोगला. तुरुंगातही त्यांनी वाचन, चिंतन आणि आत्मसंयम जोपासला. त्यांची साधेपणा, प्रामाणिकपणा आणि नैतिकता सर्वांना प्रभावित करत असे. स्वातंत्र्यानंतर शास्त्रीजींनी उत्तर प्रदेशात गृहमंत्री आणि नंतर केंद्रात रेल्वेमंत्री, गृहमंत्री म्हणून काम केले.

रेल्वे अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारून त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला, हा त्यांच्या चारित्र्याचा उत्तम नमुना मानला जातो. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या निधनानंतर ९ जून १९६४ रोजी ते भारताचे पंतप्रधान झाले. पंतप्रधान म्हणून त्यांचा कार्यकाळ अल्प पण अत्यंत महत्त्वाचा ठरला. १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धात त्यांनी देशाला खंबीर नेतृत्व दिले. जय जवान, जय किसान हा त्यांनी दिलेला नारा आजही प्रत्येक भारतीयाच्या मनात जिवंत आहे. शेतकरी आणि सैनिक या दोघांनाही त्यांनी राष्ट्राचा कणा मानले.

अन्नधान्य टंचाईच्या काळात त्यांनी सोमवारी उपवास करण्याचे आवाहन केले आणि स्वतःपासून सुरुवात केली. हरितक्रांती आणि श्वेतक्रांतीला त्यांनी प्रोत्साहन दिले. ताश्कंद करारानंतर ११ जानेवारी १९६६ रोजी ताश्कंद येथे त्यांचे रहस्यमय निधन झाले. अवघ्या अठरा महिन्यांच्या कार्यकाळात त्यांनी प्रामाणिकपणा, साधेपणा आणि देशभक्तीचा अमिट ठसा उमटवला. आजही ते त्याग आणि नेतृत्वाचे प्रतीक मानले जातात. शास्त्रीजींचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे होते. ते नेहमी धोतर कुर्ता घालत आणि सामान्य माणसासारखे जगत. पंतप्रधान असतानाही त्यांच्याकडे स्वतःची गाडी नव्हती.

त्यांनी कर्ज काढून फियाट गाडी घेतली होती. त्यांच्या पत्नी ललिता शास्त्री यांनी कुटुंबाची जबाबदारी सांभाळली. त्यांना सहा मुले होती. शास्त्रीजी मुलांना शिस्त आणि प्रामाणिकपणाचे धडे देत. ते म्हणत, कष्टाशिवाय यश मिळत नाही. त्यांचे प्रशासन पारदर्शक आणि लोकाभिमुख होते. भ्रष्टाचाराविरुद्ध त्यांची भूमिका कठोर होती. ते अधिकाऱ्यांना म्हणत की, जनतेची सेवा हाच धर्म आहे. त्यांच्या कार्यामुळे भारताचा आत्मविश्वास वाढला. आज मुघलसराय जंक्शनला पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन म्हणतात, पण शास्त्रीजींची आठवण तेथे कायम आहे. दिल्लीतील विजय घाट हे त्यांचे समाधीस्थळ आहे.

(साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



आरोग्य प्रहर

## घरच्या घरी अशा करा कॅलरीज बर्न

चालणे हा ताण कमी करण्याचा उत्तम मार्ग आहे. चालणे हा एक व्यायामाचा उत्तम प्रकार मानला जातो, ज्यामुळे शरीराला असंख्य फायदे मिळतात. रोजच्या चालण्यामध्ये सातत्य ठेवल्याने मानसिक स्वास्थ्यदेखील सुधारते. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पायी चालण्यासाठी तुम्हाला निश्चित अशी वेळ ठरवण्याची काहीच गरज पडत नाही. दरम्यान, चालताना तुम्ही दररोज किती पावले टाकली पाहिजेत आणि चालताना कोणत्या प्रकारचे पाऊल उचलले पाहिजे तसेच त्याचे अनेक फायदे आज आपण जाणून घेऊयात.




जे लोक वर्क फ्रॉम होम करतात तसेच पावसाळ्यात ज्यांना घराबाहेर पडता येत नाही अशा लोकांनी घरातच कशा प्रकारे चालले पाहिजे या संदर्भात बंगळुरूमधील स्टर व्हाईटफिल्ड हॉस्पिटलचे मुख्य फिजिओथेरपिस्ट डॉ. राजाराम एम यांनी माहिती दिली आहे. जर तुम्ही रोज फिरायला जाऊ शकत नसाल, पण तुम्हाला चालायचा व्यायाम करायचा असेल आणि वजन कमी करायचे असेल तर तुम्ही हा वर्कआउट करून पाहा.

३० सेकंदांसाठी उभे राहून पाय लांब करणे, ३० सेकंद एका जागेवर उड्या मारणे, ३० सेकंद पायाच्या बोटांवर उभं राहून गुडघे उंच करा, खाली वाकणे पुन्हा वर येणे. ३० सेकंद एकाच जागेवर हळू हळू धावा, एकदा उजव्या बाजूला एकदा डाव्या बाजूला खाली वाका. अशा प्रकारचा व्यायाम तुम्ही घरबसल्या करू शकता. प्रत्येक व्यायाम १० फेऱ्यांसाठी पुन्हा करा. यामुळे तुम्ही सहज कॅलरी बर्न करू शकता.

अशा प्रकारचे साधे व्यायाम किंवा हालचाली सक्रिय होण्यासाठी एक चांगली सुरुवात आहे, परंतु हे समजून घ्या की साधे व्यायाम कठीण वर्कआउटची जागा घेऊ शकत नाहीत. शारीरिक तंदुरुस्तीसारखी दीर्घकालीन आरोग्य उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समतोल राखणे आवश्यक आहे. डॉ. राजाराम यांच्या मते, यांसारख्या छोट्या छोट्या आणि साध्या व्यायामाचा फायदा होऊ शकतो, मात्र निरोगी जीवन जगण्यासाठी शरीराला अधिक चांगल्या प्रकारच्या वर्कआउट्सची गरज असते.

आरोग्य तंदुरुस्त ठेवण्यासाठी चालणे चांगले आहे. यामुळे तुमचे शरीर सक्रिय राहते आणि अन्नाचे पचन व्यवस्थित होते, ज्यांना मधुमेह आहे त्यांनी रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासाठी सतत चालावे. ताणतणाव, चिंता, झोप न लागणे, एकाग्रता नसणे इत्यादी गोष्टी यामुळे दूर होतात. चालण्याने रक्तदाब नियंत्रित राहतो व डोळ्यांसाठीही हे फायदेशीर आहे.

# कोंडगाव येथील शिवराज मित्र मंडळाच्या गणेशोत्सवाला पालकमंत्री गोगावले यांची भेट



**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे जवळील कोंडगाव येथे शिवराज मित्र मंडळाचा साखरचौथ गणेशोत्सव २०२६ मोठ्या उत्साहात सुरू झाला आहे. “१५ वर्ष अभिमानाची, उत्सवाची, परंपरा, संस्कृतीची, जपणुकीची” ही परंपरा जपत मंडळाच्या वतीने मंगळवार दि. २९ सप्टेंबर रोजी श्री गणरायाची विधिवत स्थापना करण्यात आली.

साखरचौथ गणेशोत्सवानिमित्त बुधवार दि. ३० सप्टेंबर रोजी रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार भरत गोगावले यांनी कोंडगाव येथे भेट देऊन श्री गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी शिवराज मित्र मंडळ कोंडगाव व शिवकन्या ग्रुप यांच्या वतीने शिवसेना युवा नेते हरीश धामणे यांच्या हस्ते नामदार भरत गोगावले यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी शिवसेना ज्येष्ठ नेते कृष्णाजी धामणे, शिवसेना नागोठणे विभागप्रमुख प्रविण ताडकर, नेते विजय धामणे, युवा नेते हरीश धामणे, विनोद धामणे, कोंडगाव शाखाप्रमुख रामचंद्र धामणे, उपशाखाप्रमुख नितेश धाडसे तसेच शिवराज युवक मंडळाचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुटखा विक्रीप्रकरणी तिघांना अटक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत चौक फाटा येथे प्रतिबंधित सुगंधित पान मसाला व तंबाखूजन्य गुटख्याचा साठा करून विक्री केल्याप्रकरणी तीन आरोपींना खालापूर पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३० सप्टेंबर रोजी सकाळी सुमारे ११.३० वाजता मौजे श्री पान शॉप, चौक फाटा, चौक, ता. खालापूर येथे ही कारवाई करण्यात आली. महाराष्ट्र शासनाने जनआरोग्याच्या हिताच्या दृष्टीने सुगंधित पान मसाला व तंबाखूजन्य पदार्थांच्या उत्पादन, साठा, वाहतूक, वितरण व विक्रीवर बंदी घातलेली असतानाही संबंधित पदार्थांचा साठा करून विक्री केली जात असल्याचे आढळून आले.

या प्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे – नेरेपाडा, तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड.**

| भुमापन नं. / हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मलाकाचे नाव |
|---|---|---|---|
| 103/4/1 | 0-72-20 पैकी 0-20-90 + पो.ख. 0-11-30 | 5.71 | श्री. अविनाश सदानंद बावकर |
| | **एकूण 0-32-20** | | |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 14 दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. 1/10/2026

सही/-
**अॅड. प्रशांत अशोक भुजबळ**

**कार्यालय :** 2, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. : 9930369861



## पनवेल महानगरपालिका

**तलुका-पनवेल, जिल्हा-रायगड ४१०२०६**

लोकनेते दि.बा.पाटील विद्यालय, आगरी समाज हॉल व दांडेकर हॉस्पिटल समोर, पनवेल – 410206.

Email – msbpanvel1993@gmail.com    Email : panvelcorporation@gmail.com

## जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील LKG व UKG वर्गातील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेतील प्राविण्यासोबतच इतर भाषांचे सुलभ, आनंदायी व प्रभावी शिक्षण मिळावे यासाठी “बोलकी पुस्तके (Talking Pen)" हा अभिनव शैक्षणिक उपक्रम राबविण्याचा प्रस्ताव सादर करीत आहे. हा उपक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 च्या मार्गदर्शक तत्वांनुसार आखलेला आहे.

सदर प्रस्तावित कार्यक्रमासाठी अंदाजित खर्च निश्चित करण्याच्या दृष्टीने इच्छुक निविदाधारक / नोंदणीकृत संस्था यांचेकडून खालील तपशीलानुसार बाजारभावासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| Sr. | Jr/LKG -12 पुस्तके | प्रमाण/नग | दर (GST) सह |
|---|---|---|---|
| 1 | English Reader For Leaders - Part B | | |
| 2 | English Activity - Part B | | |
| 3 | English Writing - Part B | | |
| 4 | Little Artist- Part B | | |
| 5 | Math A Magic - Part B | | |
| 6 | Maths Activity - Part B | | |
| 7 | Rhymes & Stories - Part B | | |
| 8 | World Around Me - Part B | | |
| 9 | World Around Me Activity Book - Part B | | |
| 10 | Cursive Writing - Part A | | |
| 11 | Shabd Gyan | | |
| 12 | Shabd Rachna | | |

| Sr. | Jr/LKG -12 पुस्तके | प्रमाण/नग | दर (GST) सह |
|---|---|---|---|
| 1 | English Activity - Part C | | |
| 2 | English Reader For Leaders - Part C | | |
| 3 | Little Artist-Part C | | |

दिनांक : ०१/१०/२०२६
जा.क्र.पमपा/शिक्षण/आस्था/-१/५१९/२०२६

सही/-
**शिक्षणाधिकारी**
पनवेल महानगरपालिका



महसुल व वन विभाग
महाराष्ट्र शासन

## तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे कार्यालय

**मध्यवर्ती प्रशासकीय भवन, माणगाव, ता. माणगाव, जि. रायगड**

ई-मेल आयडी : tahsilmangaon@gmail.com

क्रमांकःमशा/आस्था-२/महसुल सेवक (कोतवाल) पद भरती /जाहीरनामा /२०२६    दिनांक ०२/१०/२०२६

## महसुल सेवक (कोतवाल) संवर्ग सरळसेवा भरती २०२६ जाहिरनामा

**विषय :- महसुल सेवक (कोतवाल) संवर्गातील आरक्षणानुसार रिक्त पदे भरण्याबाबत.**

संदर्भः- १) शासन महसुल व वन विभागाकडील पत्र क्र. पदभ-२०२५/प्र.क्र.९८/आस्था-१०, दि.३/०९/२०२६
२) मा. जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांचेकडील पत्र क्रमांक/मशा/आस्था-१/अ-८(१)/कोतवाल भरती/२०२६, दि.०३/०९/२०२६
३) दि.२८/०९/२०२६ रोजी पार पडलेल्या महसुल सेवक (कोतवाल) आरक्षण सोडतीचे इतिवृत्त.

माणगाव तालुक्यातील (१) कांदळगांव, (२) उणेगांव, (३) दहिवली, (४) मोर्बा, (५) मांजरवणे, (६) गोरेगांव, (७) लोणेरे, (८) साले, (९) पुरार, (१०) होडगांव, (११) रातवड, (१२) खरवली या रिक्त सजांवर खालील तयात नमुद केल्याप्रमाणे प्रवर्गनिहाय **महसुल सेवकांची नेमणुक केली जाणार आहे. तरी ज्या व्यक्तीस महसुल सेवक (कोतवाल) म्हणून काम करणेची इच्छा आहे,** त्यांनी तहसिलदार माणगाव यांचे कार्यालयात दि.०२/१०/२०२६ ते दि.१७/१०/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) समक्ष पोहोच होईल अशा रितीने विहीत नमुन्यामध्ये आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्ज दाखल करावा. विहीत मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**महसुल सेवक (कोतवाल) पद नियुक्तीसाठी आरक्षण प्रवर्ग खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | जात प्रवर्ग | समांतर आरक्षण | पदांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | अनु. जाती | ---- | १ |
| २ | अनु. जमाती | ---- | १ |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ---- | १ |
| ४ | भटक्या जमाती (क) | महिला | १ |
| ५ | इतर मागास वर्ग | ---- | २ |
| ६ | इतर मागास वर्ग | महिला | १ |
| ७ | सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग (SEBC) | ---- | १ |
| ८ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) | महिला | १ |
| ९ | खुला / अराखीव | ---- | २ |
| १० | खुला/अराखीव | महिला | १ |
| **एकूण भरावयाची पदे** | | | **१२** |

**१.महसुल सेवक (कोतवाल) पदाच्या भरतीसाठी उमेदवार खालील अटी व शर्तीस पात्र असावा :**

**१. शैक्षणिक अर्हता :-** उमेदवार किमान इय्यत्ता ४ थी उत्तीर्ण असावा व त्यास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील.

**२. वयोमर्यादाः-**

२.१ सर्व प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी जाहिरनामा प्रसिध्द होणाऱ्या दिनांकास म्हणजे दि. ०२/१०/२०२६ रोजी किमान १८ वर्षे व कमाल ४० वर्षे वय असावे.

२.२ महसुल सेवक (कोतवाल) हे पद वर्ग-अ ते वर्ग-ड अशा कोणत्याही संवर्गात मोडत नाही. सदरील पद हे अवर्गीकृत असल्यामुळे सामाजिक, आर्थिक आरक्षण आणि महिला आरक्षण वगळता अन्य कोणत्याही आरक्षणाच्या तरतुदी व अन्य सवलती जसे की, वयोमर्यादेतील शिथिलता इत्यादी बाबी महसुल सेवक (कोतवाल) भरतीसाठी लागू असणार नाही.

३. **रहिवास :-** उमेदवार माणगाव तालुक्यातील रहीवाशी असावा. तसेच उमेदवारास गावच्या स्थानिक व भौगोलिक परिस्थितीचे ज्ञान असावे.

४. **आरक्षण :**

४.१ सामाजिक आरक्षणांतर्गत राखीव जागांच्या बाबतीत अर्जदाराला सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जातीचा / प्रवर्गाचा दाखला आणि नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र (लागू असेल तेथे) यांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

४.२ मागासवर्गीय उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले मूळ जात प्रमाणपत्र व मूळ जात वैधता प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणी वेळी सादर करणे आवश्यक राहील. निवड होणाऱ्या मागासवर्गीय घटकातील उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६- ब दि.१२/१२/२०११ यातील तरतुदीस अधिन राहून जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्याच्या आत सादर करण्याच्या अटीवर बंधपत्र/शपथपत्र लिहुन दिल्यानंतर तात्पुरती नियुक्ती दिली जाईल. नियुक्तीनंतर कमाल ६ महिन्यांच्या विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असून विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

४.३ अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती वगळून अन्य प्रवर्गातील मागासवर्गीय उमेदवारांनी चालू तारखेस वैध असणारे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षंकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

४.४ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील उमेदरावांराकरीता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक राआधो- ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि.१२/०२/२०१९ व दि.३१/०५/२०२१ अन्वये विहीत करण्यात आलेले चालू तारखेस वैध असणारे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांमध्ये (EWS) मोडत असल्याबाबतच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

४.५ सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातील (SEBC) उमेदवारांकरिता महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२४/प्र.क्र.७५/कारकून-५, दिनांक २९ जानेवारी २०२५ (किंवा तत्सम लागू असणाऱ्या अधिनियमानुसार व समयचित शासन निर्णयानुसार) विहित करण्यात आलेले, चालू तारखेस वैध असणारे जात प्रमाणपत्र (Caste Certificate), आणि नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate) यांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्याच्या आत सादर करण्याच्या अटीवर बंधपत्र / शपथपत्र लिहुन दिल्यानंतर तात्पुरती नियुक्ती दिली जाईल. नियुक्तीनंतर कमाल ६ महिन्यांच्या विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असून विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

५ **वर्तणूक :**

५.१ अर्जदारांवर कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल नसावा. अथवा कोणत्याही फौजदारी गुन्ह्यात शिक्षा / दंड झालेला नसावा. अंतिम निवड झालेल्या उमेदवारांनी निवडीनंतर १ महिन्याच्या आत सक्षम अधिकारी यांचा चारित्र्य व वर्तणूक प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५.२ महसुल सेवकास त्याची नेमणूक झाल्यानंतर भारतीय संविधानाशी निष्ठा व्यक्त करणारी विहीत केलेली शपथ घ्यावी लागेल व त्याप्रमाणे आचरण ठेवावे लागेल.

५.३ भरती प्रक्रियेदरम्यान कोणताही राजकीय/अन्य प्रकारचा दबाव आणल्यास अर्जदारास तात्काळ अपात्र ठरविण्यात येईल.

५.४ अर्जदार हा कोणत्याही राजकीय पक्षाचा अथवा राजकीय संघटनेचा सभासद नसावा.

५.५ अर्जदार हा महसुल सेवक (कोतवाल) पदाची कर्तव्ये पार पाडणेस बाधक अथवा हानिकारक होईल अशा कोणत्याही व्यवसायात/कामात गुंतलेला नसावा.

६. **शारिरीक पात्रताः-**

६.१ अर्जदाराचे शारिरिक व मानसिक आरोग्य उत्तम असावे.

६.२ अंतिम निवड झालेल्या उमेदवारांनी निवडीनंतर १ महिन्याच्या आत शारीरिक तंदुरुस्तीबाबतचे मा. जिल्हा शल्य चिकित्सक, अलिबाग यांचेकडील वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

७. **मानधन व सवलती :-**

७.१ शासनाने वेळोवेळी सुधारित केलेल्या दराने व नियमानुसार देय असलेले मानधन तसेच वेळोवेळी देय केलेल्या सवलती महसुल सेवक (कोतवाल) पदास अनुज्ञेय असतील.

८. **सेवा शर्ती नियमः-**

८.१ महसुल सेवक (कोतवाल) नियुक्ती अस्थायी तत्वावर असेल.

८.२ महसुल सेवक (कोतवाल) हे पद अवर्गीकृत असून शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या सेवा शर्ती लागू राहतील तसेच त्यांना नियमित वेतन अथवा कोणतेही सेवा निवृत्ती विषयक लाभ मिळणार नाही.

**२. अर्ज भरण्याची पध्दत :**

२.१ प्रस्तुत पदासाठी विहीत नमुन्यातील अर्ज तहसीलदार माणगांव यांचे कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावा. अर्जासाठी रोख स्वरुपात शुल्क रु.५०/- आकारण्यात येतील. शुल्क पावती अर्ज घेतेवेळी प्राप्त करुन घ्यावी.

२.२ तहसीलदार कार्यालयाकडून प्राप्त करुन घेण्यांत आलेला अर्जच ग्राहय धरण्यात येईल. याव्यतिरिक्त अन्य मार्गाने प्राप्त केलेला अर्ज (उदा.झेरॉक्स प्रतीवर अर्ज करणे, अन्य ठिकाणाहून छपाई करुन घेणे) दाखल केल्यास असा अर्ज छाननी वेळी बाद केला जाईल.

२.३ अर्ज व सोबतची कागदपत्रे ही बंद लिफाफ्यामध्ये देण्यांत यावीत. लिफाफ्यावर आपले पुर्ण नांव व पत्ता नमुद करण्यांत यावा.

२.४ अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत व कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अर्ज सादर करणे आवश्यक राहील. अन्य मार्गाने उदा. पोष्टाव्दारे, ई-मेलव्दारे अथवा अन्य मार्गाने आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. त्याचप्रमाणे विहीत मुदतीनंतर अर्ज स्विकारला जाणार नाही.

२.५ ज्या आरक्षण/ प्रवर्गातून अर्ज करीत आहात ते अर्जावर स्पष्ट नमुद असणे आवश्यक आहे. अर्धवट अथवा स्पष्टता नसलेला अर्ज अपुर्ण समजून छाननी वेळी बाद केला जाईल.

२.६ उमेदवाराने त्यांचे अलीकडील काळातील रंगीत छायाचित्र अर्जावर विहीत जागी स्वसाक्षांकित करुन घट्ट चिकटवावे. याशिवाय अतिरिक्त दोन रंगीत छायाचित्रे अर्जासोबत द्यावीत.

२.७ अर्जासोबत लहान कुटूंबाचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. त्याचा नमूना विहीत नमुन्यातील अर्जासोबत उपलब्ध करुन दिला आहे. उमेदवार अविवाहीत असल्यास लहान कुटूंबाच्या प्रमाणपत्रावर अविवाहीत असे स्पष्ट नमुद करावे. लहान कूटूंबाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडले नसल्यास, असा अर्ज फेटाळणेस पात्र राहील.

२.८ शैक्षणिक अर्हतेच्या प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती साक्षांकित/स्वसाक्षांकीत करुन अर्जासोबत जोडाव्यात.

२.९ अर्जासोबत जातीच्या प्रमाणपत्राची व जात वैधता प्रमाणपत्राची (असल्यास) साक्षांकित/स्वसाक्षांकीत प्रत जोडावी.

२.१० अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व्यतिरिक्त मागास प्रवर्गातील सर्व उमेदवारांना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे चालु तारखेस वैध असणाऱ्या नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित / स्वसाक्षांकीत प्रत अर्जासोबत जोडावी. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक उमेदवारांनी चालु तारखेस वैध असणारा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रमाणपत्राची साक्षांकित/स्वसाक्षांकीत प्रत अर्जासोबत जोडावी.

२.११ इतर मागासवर्गीय प्रवर्गातील उन्नत / प्रगत (क्रिमीलेअर) व्यक्तींना इतर मागासवर्गीय प्रवर्गाचे आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

२.१२ अर्जदार ज्या आरक्षण प्रवर्गातून अर्ज करणार आहे, तो आरक्षण प्रवर्ग अर्जामध्ये अचूक रितीने नमूद करणे आवश्यक आहे. अन्यथा सदर अर्ज फेटाळणेस पात्र राहील. याबाबत नंतर कोणतीही तक्रार चालणार नाही.

२.१३ अर्जदार यांनी ज्या प्रवर्गातून अर्ज केला आहे, त्याच प्रवर्गातून त्याच्या अर्जाचा विचार केला जाईल. याबाबत कोणतीही तक्रार नंतर चालणार नाही.

२.१४ विहीत नमुन्यातील नसलेला अर्ज, विहीत शुल्क भरणा न केलेल्या उमेदवाराचे अर्ज, विहीत शैक्षणिक / रहिवास / जात प्रवर्ग इत्यादी अर्हता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज, अपूर्ण व चुकीचे भरलेले अर्ज, सर्व आवश्यक कागदपत्रे साक्षांकित करुन न जोडलेले अर्ज, फोटो नसलेला व स्वसाक्षांकित न केलेला अर्ज आणि विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे व विहीत मार्गाने प्राप्त न होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२.१५ अर्जदाराने किमान शैक्षणिक अर्हता धारण करित असल्याच्या प्रमाणपत्राची प्रत सादर करणे बंधनकारक आहे. चौथी उत्तीर्ण झाल्यानंतर उमेदवाराच्या नावात कोणताही बदल झाला असल्यास, त्या पृष्ठर्थ संबंधीत शासन राजपत्राची साक्षांकीत प्रत सादर करणे आवश्यक आहे.

२.१६ महिला उमेदवाराने पुर्वाश्रमीच्या नावाने (By Birth) विहीत नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

२.१७ अर्जासोबत कुठल्याही राजकीय पक्षाची / संघटनेची / व्यक्तिची शिफारस जोडलेली नसावी. अन्यथा सदरील अर्ज तात्काळ अपात्र ठरविण्यात येईल.

२.१८ अर्जामध्ये खोटी, चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती देणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरवले जाईल.

**३. अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे :**

३.१ इयत्ता चौथी उत्तीर्ण गुणपत्रिका किंवा महत्तम प्राप्त शैक्षणिक गुणवत्ता दर्शविणारी गुणपत्रिका/सनद.

३.२ शाळा सोडलेचा दाखला किंवा जन्मतारखेचा उल्लेख असलेले बोनाफाईड प्रमाणपत्र किंवा माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र किंवा सनद किंवा जन्म दाखला.

३.३ माणगांव तालुक्यातील गावचा रहिवाशी असलेबाबत पोलीस पाटील अथवा ग्रामसेवक यांनी दिलेला रहिवाशी दाखला.

३.३ महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्राची (डोमासाईल) प्रत.

३.४ अर्जासोबत आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, पॅनकार्ड यापैकी कोणत्याही एका ओळखपत्राची स्वसांक्षाकित प्रत जोडावी.

३.५ आरक्षित पदाचे अर्जाकरीता जातीचे प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास), इतर मागासवर्गा करीता उन्नत गटात मोडत नसल्याबाबत चालू तारखेस वैध असणारे प्रमाणपत्र (Non Creamy Layer Certificate),आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांसाठी चालू तारखेचे EWS प्रमाणपत्र (जे लागू असेल ते) जोडणे अनिवार्य आहे.

३.६ सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित अथवा स्वसाक्षांकीत करुन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच सर्व मूळ कागदपत्रे पडताळणीचे वेळेस सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविले जाईल.

**४. परीक्षा शुल्क :**

४.१ उमेदवारांनी परीक्षा शुल्क रक्कम रु.५००/- (अक्षरी रुपये पाचशे मात्र) रोख स्वरुपात तहसीलदार माणगांव यांचे कार्यालयात अर्ज दाखल करतेवेळी जमा करणे आवश्यक आहे. परिक्षा शुल्क पावती अर्ज दाखल करतेवेळी प्राप्त करुन घ्यावी.

४.२ परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-Refundable) व अपरिवर्तनीय (Non-Transferable) राहील.

**५. परीक्षा पध्दती व निकाल**

**परीक्षा पध्दती :**

५.१ महसुल सेवक (कोतवाल) पदाचे निवडीकरीता महसुल व वनविभाग शासन निर्णय दि.१७/०५/२०२३ अन्वये विहीत केलेप्रमाणे १०० गुणांची लेखी परीक्षा असेल. लेखी परीक्षा दि.१५/११/२०२६ रोजी प्रवेशपत्रावर नमुद केलेल्या परीक्षा केंद्रावर व नमुद केलेल्या वेळी घेण्यात येईल.

५.२ लेखी प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल. सदर प्रश्नपत्रिकेत एकूण ५० प्रश्न असून प्रत्येक बरोबर उत्तरासाठी २ गुण मिळतील. चुकीच्या उत्तरासाठी गुण वजा होणार नाहीत.

५.३ लेखा परिक्षेत सामान्य ज्ञान, अंकगणित, मराठी भाषा, रायगड जिल्हयाची भौगोलिक व ऐतिहासिक माहिती इ. यांचा समावेश राहील.

५.४ गुणवत्ता क्रम हा लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारावर म्हणजेच एकुण १०० गुणांपैकी मिळालेल्या गुणांच्या आधारावर राहील.

५.५ परीक्षेच्या दरम्यान कोणतेही अनुचित/बेकायदेशीर कृत्य करणाऱ्या अथवा करण्याचा प्रयत्न करणाऱ्या उमेदवारांना भरती प्रक्रियेतून तात्काळ अपात्र ठरविले जाईल.

**निकाल पध्दती :**

५.६ परीक्षा पार पडलेनंतर उत्तर तालिका तहसिल कार्यालय माणगाव व उपविभागीय अधिकारी कार्यालय माणगाव येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर उत्तरतालिका अंतिम राहील व त्यावर कोणतेही आक्षेप स्विकारले जाणार नाहीत.

५.७ लेखी परीक्षेचा निकाल उमेदवारांच्या आसन क्रमांकाच्या यादीसह तहसिल कार्यालय माणगाव व उपविभागीय अधिकारी कार्यालय माणगाव येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल.

५.८ लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे संवर्ग निहाय उमेदवारांची निवडयादी व प्रतिक्षा यादी तयार केली जाईल.

५.९ किमान पात्रता गुणांबाबत तसेच पात्रतेसाठी एकाहून अधिक उमेदवारांना समसमान गुण मिळाल्या प्रकरणी प्रचलीत शासन निर्णय/नियम यामध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

५.१० निवड करण्यात आलेले उमेदवार नियुक्ती आदेश पारित केलेल्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत रुजू न झाल्यास प्रतिक्षा यादीमधील पुढील उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल. याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

५.११. उमेदवाराचे मुळ दस्ताऐवज पडताळणी केल्यानंतरच अंतिम निवड यादीतील पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यात येईल.

**६. इतर अटी व शर्ती :**

६.१ नियुक्ती देणेचे नियमात, पदसंख्येत/आरक्षणात बदल करणे, रद्द करणचे, परिक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे, सेवा भरती प्रक्रीयेत बदल करणे तसेच, भरती प्रक्रीयेसंदर्भात उद्भवणारे वाद, अन्य कोणतीही तांत्रीक/प्रशासकीय अडचणी/तक्रारी याबाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकार अध्यक्ष, महसुल सेवक (कोतवाल) निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी, उपविभाग माणगाव यांजकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

६.२ शासनाने भरतीबाबत / नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक, आदेश इत्यादी भरती प्रक्रीयेला लागू राहतील.

६.३ वरील ६.१ व ६.२ याबाबतीत अध्यक्ष, महसुल सेवक (कोतवाल) निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी, उपविभाग माणगाव यांनी घेतलेला निर्णय अंतिम असेल. पदांच्या संख्येबाबत उमेदवारांची कोणतीही हरकत अथवा तक्रार यांचा विचार केला जाणार नाही, याची उमेदवारांनी अर्ज भरताना नोंद घ्यावी.

६.४ उमेदवारांस महसुल सेवक (कोतवाल) म्हणून नेमणूक दिल्यानंतर नेमणूकीच्या सजेमध्ये वास्तव्य करणे बंधनकारक राहणार आहे अन्यथा सदर महसुल सेवक (कोतवाल) पदांवर त्यांची नियुक्ती संपुष्टात येईल. नियुक्ती नंतर उमेदवाराने नियुक्तीच्या महसुल सेवक (कोतवाल) सजेमध्ये वास्तव्यास राहणार असलेबाबत हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.

६.५ उमेदवाराने महसुल सेवक (कोतवाल) नियुक्ती पदावर हजर होताना मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील नियम ५१ च्या तरतूदीनुसार वैयक्तीक प्रतिपुर्ती बंधपत्र सादर करावे लागेल.

६.६ महसुल सेवक (कोतवाल) हा पुर्णवेळ काम करणारा सेवक असेल.

**७. महसुल सेवक (कोतवाल) भरतीचा कालबध्द कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे :**

| अ.क्र. | तपशिल | निश्चित केलेला दिनांक |
|---|---|---|
| १ | जाहीरनामा प्रसिध्द करणे | दि. ०२/१०/२०२६ |
| २ | अर्ज दाखल करणे व अर्ज प्राप्तीचा शेवट दिनांक | दि. ०२/१०/२०२६ ते १७/१०/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) |
| ३ | अर्ज छाननी करणे | दि.१८/१०/२०२६ ते ०१/११/२०२६ |
| ४ | प्रवेशपत्र उपलब्ध करणे | दि.०४/११/२०२६ ते १०/११/२०२६ (उमेदवारांनी समक्ष आपले ओळखपत्र दाखवून तहसील कार्यालय माणगांव येथून कार्यालयीन दिवशी व वेळी प्रवेशपत्र प्राप्त करुन घ्यावे.) |
| ५ | लेखी परिक्षा | दि.१५/११/२०२६ |
| ६ | उत्तरसुची आणि निकाल घोषणा | दि.१६/११/२०२६ |
| ७ | दस्तऐवज पडताळणी | दि.१७/११/२०२६ ते २७/११/२०२६ |
| ८ | नियुक्तीपत्र | दि.२८/११/२०२६ |

तथापि अपरिहार्य कारणास्तव वरील कार्यक्रमात बदल करणेचा संपूर्ण अधिकार निवड समितीकडे असून अशा प्रकरणी सुधारित कार्यक्रम तपशील तहसिल कार्यालय माणगाव व उपविभागीय अधिकारी कार्यालय माणगाव येथील नोटीस बोर्डवर ..प्रसिध्द करणेत येईल.

ठिकाणः माणगाव
दिनांकः- ०२/१०/२०२६

**सही/-xx**
**सदस्य सचिव,**
महसुल सेवक (कोतवाल)
निवड समिती, तथा तहसीलदार माणगाव

# घणसोलीत मध्यरात्री अग्नितांडव

## चार दुकाने जळून खाक, मोठे आर्थिक नुकसान

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

घणसोली गावातील इंद्रावती रुग्णालयाशेजारी असलेल्या दुकानांना मध्यरात्रीच्या सुमारास भीषण आग लागल्याने परिसरात खळबळ उडाली. बुधवारी मध्यरात्री सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास दुकानांमधून धूर आणि आगीच्या ज्वाळा दिसून आल्याने स्थानिक नागरिकांनी तत्काळ अग्निशमन दलाला माहिती दिली. काही वेळातच आगीने रौद्र रूप धारण करून लगतची दुकानेही कवेत घेतली. आगीत चार दुकाने जळून खाक झाली असून दुकानांतील साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. घणसोली गावातील इंद्रावती रुग्णालयालगत दुकानांची रांग आहे. मध्यरात्रीच्या वेळी बहुतांश दुकाने बंद असताना एका दुकानातून आग भडकली. सुरुवातीला दुकानातून धूर येत असल्याचे स्थानिकांच्या लक्षात आले, मात्र आग वेगाने पसरत गेल्याने काही वेळातच शेजारील दुकानांनाही त्याची झळ बसली. आगीच्या ज्वाळा मोठ्या प्रमाणात दिसत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच नवी मुंबई महापालिकेच्या अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. वाशी अग्निशमन दलाचे केंद्र अधिकारी रोहन कोकाटे यांनी दिलेल्या माहितीनुसार आगीची माहिती मिळताच कोपरखैरणे विभागाच्या दोन अग्निशमन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. जवानांनी तातडीने आग विझविण्याचे काम सुरू केले. आग आणखी पसरू नये यासाठी परिसर सुरक्षित करत पाण्याचा मारा करण्यात आला.

अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन दलाला यश आले, मात्र आग आटोक्यात येईपर्यंत चार दुकाने पूर्णपणे जळाली होती. दुकानांमधील साहित्य, फर्निचर तसेच अन्य वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. आगीची तीव्रता आणि दुकानांमध्ये असलेल्या साहित्यामुळे नुकसान वाढल्याची शक्यता आहे. या नुकसानीचा नेमका आकडा अद्याप स्पष्ट झालेला नाही. संबंधित दुकानदारांकडून नुकसानीचा तपशील घेतल्यानंतर त्याची माहिती समोर येण्याची शक्यता आहे. दरम्यान, आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. प्राथमिक स्तरावर विद्युत बिघाड किंवा शॉर्टसर्किटची शक्यता तपासली जात आहे, मात्र त्याबाबत अग्निशमन दलाकडून अधिकृत कारण स्पष्ट करण्यात आले नाही.

घटनास्थळाची पाहणी तसेच उपलब्ध पुराव्यांच्या आधारे आगीचा उगम आणि कारण शोधण्याचे काम सुरू आहे. पोलिसांकडूनही या घटनेची माहिती घेण्यात येत आहे. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी मध्यरात्री दुकानांना लागलेल्या आगीमुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. दुकानांची रचना, विद्युत जोडण्या आणि आगीच्या संभाव्य कारणांची तपासणी झाल्यानंतर या घटनेमागील नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

# नवी मुंबई भाजपचा कार्यअहवाल प्रकाशित

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भाईंदर येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६' चे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणादरम्यान भाजप नवी मुंबई जिल्हाध्यक्ष राजेश पाटील यांनी भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची भेट घेतली. यावेळी भारतीय जनता पार्टी, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष राजेश पाटील यांच्या कार्यकाळातील विविध सामाजिक, संघटनात्मक व जनसेवेच्या कार्याचा कार्यअहवाल भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा आमदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला.



यावेळी प्रदेश महामंत्री राजेश पांडे, नगरसेवक दीपक पवार, परिवहन समिती सदस्य अभिजीत पेडणेकर यांची उपस्थिती होती. या कार्य अहवालाच्या माध्यमातून नवी मुंबई जिल्ह्यात पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी तसेच समाजहितासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा आणि जनसेवेच्या कार्याचा आढावा मांडण्यात आला.

# 'केबीपी'मध्ये मानसिक स्वास्थ्यावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र उत्साहात



**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात मानसशास्त्र विभागाच्या वतीने 'सामाजिक समावेश आणि मानसिक स्वास्थ्य : विकसित भारत २०४७' या विषयावर २९ व ३० सप्टेंबर रोजी दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. चर्चासत्राचे उद्घाटन नवी मुंबईतील ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ विकास देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विज्ञान विभागाचे अधिष्ठाता सुनील जगधनी होते.

यावेळी मानसोपचारतज्ज्ञ विकास देशमुख यांनी मानसिक आरोग्याबद्दल सविस्तर भाष्य केले. शारीरिक आरोग्यापेक्षा मानसिक आरोग्य श्रेष्ठ आहे. मानसिक ताण वाढत गेला तर मानसिक त्रास होतो आणि पुढे त्याचे मानसिक विकारात रूपांतर होते. शारीरिक दुखापतीप्रमाणे मानसिक आरोग्याच्या समस्या दिसत नाहीत, त्यामुळे आपण सर्वांनी मानसिक आरोग्याकडे अधिक लक्ष देण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. मानसशास्त्राकडे केवळ व्यक्तीला समजून घेणारे शास्त्र म्हणून न पाहता सामाजिक प्रश्न आणि मानवी दुःख समजून घेणारे सामाजिक शास्त्र म्हणून पाहिले पाहिजे, असे प्रतिपादन गौतम गवळी यांनी यावेळी केले. तसेच होमी भाभा विद्यापीठाचे कुलसचिव विलास पाध्ये यांनी तंत्रज्ञान आणि भारतातील तरुणांचे मानसिक आरोग्य या विषयावर भाष्य केले. चर्चासत्रामध्ये नेपाळ, हिमाचल प्रदेश, बेंगळुरू व महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांतून २१४ प्राध्यापक व १७७ विद्यार्थी सहभागी झाले होते.

चर्चासत्राला नवी दिल्ली येथील भारतीय सामाजिक विज्ञान व संशोधन परिषदेचे अनुदान लाभले. नियोजन प्राचार्या शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्रास्ताविक मानसशास्त्र विभागाचे प्रवीण बाविस्कर, तर कला विभागाचे अधिष्ठाता शकील शेख यांनी आभार मानले. चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्या राजेश्री घोरपडे आदींनी विशेष प्रयत्न केले.

# स्वच्छ-सुंदर पनवेलसाठी रिड्यूस, रियूज आणि रिसायकल सेंटर

## महापौरांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या स्वच्छता ही सेवा अभियान अंतर्गत प्रभाग क्रमांक १८मधील वडाळे तलाव, अशोक बाग बूथ येथे रिड्यूस, रियूज आणि रिसायकल सेंटर उभारण्यात आले असून या केंद्राचे उद्घाटन महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते झाले. या केंद्राच्या माध्यमातून कचऱ्याचे प्रमाण कमी करणे, वापरातील वस्तूंचा पुनर्वापर करणे आणि रिसायकलिंगला चालना देणे याविषयी नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती केली जाणार आहे.



या कार्यक्रमास महापालिकेच्या महिला व बालकल्याण समिती सभापती ममता म्हात्रे, प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, नगरसेविका प्रीती जॉर्ज, उपायुक्त वैभव विधाते, आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, स्वच्छतादूत यांच्यासह महापालिकेचे इतर अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

स्वच्छ पनवेल, सुंदर पनवेल ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी नागरिकांनी आपल्या दैनंदिन जीवनात कचरा व्यवस्थापनाच्या या त्रिसूत्रीचा अंगीकार करावा, असे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# ऑनलाइन जुगाराच्या नादात चेन स्नॅचिंग; नऊ गुन्हे उघड

**नवी मुंबई : बातमीदार**

ऑनलाइन जुगाराच्या व्यसनातून पैशांची गरज भागवण्यासाठी चेन स्नॅचिंग करणाऱ्या डिलिव्हरी बॉयला नवी मुंबई गुन्हे शाखेच्या कक्ष-१ने अटक केली आहे. या कारवाईत चेन स्नॅचिंगचे नऊ गुन्हे उघडकीस आले असून सोन्याचे मंगळसूत्र व चेन तसेच गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण तीन लाख ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

सानपाडा, वाशी व कोपरखैरणेत वारंवार घडणाऱ्या चेन स्नॅचिंगच्या घटनांचा तपास करताना गुन्हे शाखेच्या पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. यावेळी संशयित आरोपी मोटारसायकलवरून गुन्हे करत असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे संशयिताचा माग काढला. चेन स्नॅचिंगच्या प्रयत्नादरम्यान पोलीस हेड कॉन्स्टेबल चंद्रकांत कदम आणि पोलीस कॉन्स्टेबल सागर सोनावळकर यांनी प्रसंगावधान राखून आरोपीला ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेला आरोपी कुमार बाबू चव्हाण (२४) हा ब्लिंकिटमध्ये डिलिव्हरी बॉय म्हणून काम करत होता. सानपाडा, वाशी आणि कोपरखैरणे परिसरातील रस्ते, गल्लीबोळ तसेच ये-जा करण्याच्या मार्गांची त्याला चांगली माहिती होती.

तपासात त्याला मोबाइलवर ऑनलाइन जुगार खेळण्याचे व्यसन असल्याचे समोर आले. जुगारात पैसे गमावल्यानंतर पुन्हा पैसे मिळवण्यासाठी तो चेन स्नॅचिंग करत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणात चोरीचा मुद्देमाल स्वीकारल्याच्या आरोपावरून संबंधित सोनारालाही आरोपी करण्यात आले आहे. जगदीशचंद रामचंद कुमावत (३३) असे त्याचे नाव असून त्याच्याकडे पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# उरणमध्ये नेतृत्व संवाद बैठक संपन्न

**उरण : प्रतिनिधी**

सत्यमेव जयते पाणी फाउंडेशन, कृषी विभाग आणि उमेद यांच्या संयुक्त विद्यमाने उरण तालुक्यातील चिरनेर येथील ग्रामपंचायत सभागृहात 'नेतृत्व संवाद' बैठकीचे आयोजन गुरुवारी (दि. १) करण्यात आले होते. फार्मर कपमध्ये सहभागी झालेल्या शेतकरी गटांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत ही बैठक उत्साही वातावरणात पार पडली.



बैठकीला कृषी सहाय्यक अधिकारी अदीका पानसरे, उपकृषी अधिकारी अलका बुरकुल, कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा अंबुलगेकर तसेच पाणी फाउंडेशनचे मार्गदर्शक आशिष लाड व विजय नाचरे यांच्यासह शेतकरी गटांचे प्रतिनिधी व शेतकरी उपस्थित होते. यावेळी फार्मर कपच्या माध्यमातून शेतकरी गटांनी केलेल्या कामाचा आढावा घेताना खरीप हंगामानंतर गटाची पुढील वाटचाल, गटातील एकजूट, सामूहिक शेती आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक समृद्धीसाठी भविष्यातील उपक्रम याबाबत बैठकीत सकारात्मक संवाद साधण्यात आला. बैठकीत विविध शेतकरी गटांच्या प्रतिनिधींनी फार्मर कपमधील आपले अनुभव कथन केले. गटाच्या माध्यमातून भविष्यात शेतीविषयक उपक्रम, सामूहिक नियोजन, उत्पादनवाढ, बाजारपेठेशी जोडणी तसेच शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी कोणते उपक्रम राबवता येतील याबाबत विचारमंथन करण्यात आले.

फार्मर कप ही केवळ स्पर्धा नसून शेतकरी गटांच्या संघटनात्मक आणि आर्थिक विकासासाठीची एक संधी आहे. या भूमिकेतून पुढील वाटचालीचे नियोजन करण्यात आले. गटातील एकजूट कायम ठेवून सामूहिक प्रयत्नांच्या माध्यमातून शेतीतून समृद्धीकडे वाटचाल करण्याचा निर्धार या नेतृत्व संवादातून व्यक्त करण्यात आला. नेतृत्व संवादाच्या माध्यमातून शेतकरी गटांना केवळ फार्मर कपपुरते मर्यादित न ठेवता त्यांना भविष्यातील सामूहिक शेती, व्यवसाय आणि शाश्वत विकासाच्या दिशेने पुढे नेण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

# वीर वाजेकर महाविद्यालयाचा सेवायज्ञ

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय व रॉबिनहूड आर्मी यांच्या वतीने आदिवासी पाड्यांवरील संयुक्त सेवायज्ञ राबवण्यात आला. शिक्षणाची गंगा बहुजन, कष्टकरी व उपेक्षित घटकांच्या दारापर्यंत नेणारे शिक्षणमहर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९व्या जयंतीचे औचित्य साधून उरणमधील दुर्गम आदिवासी कातकरी पाड्यांवर शाळेत जाऊन अन्नधान्य व खाऊ वाटपाचा उपक्रम राबवण्यात आला.



यात महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, हिंदी विभाग, अर्थशास्त्र विभाग, मराठी विभाग, वाणिज्य विभाग, बीएमएस विभाग व ग्रामीण विकास विभाग यांनी सहभाग नोंदवला. रॉबिनहूड आर्मीच्या सहकार्याने उपक्रमांतर्गत यापूर्वी कंठवली आदिवासी वाडी व विंधणे आदिवासी वाडी येथील १३५ गरजू कुटुंबांना अन्नदान करण्यात आले. चिरनेर आक्कादेवी आदिवासी शाळा व अंगणवाडी परिसरातील २५ कुटुंबांना अन्नधान्य वितरित करण्यात आले. सारडे जिप शाळेतील ३८ विद्यार्थ्यांना, महाविद्यालयातील सर्व सफाई कामगारांनाही धान्य वितरित करण्यात आले.

पीरवाडी येथील कातकरवाडी जिप प्राथमिक शाळेतील २५ विद्यार्थ्यांनाही अन्नधान्य व खाऊचे वाटप करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांच्या वतीने बिस्किटे वाटण्यात आली. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून या वाटप मोहिमेचे नेतृत्व केले. समवेत राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीकांत गोतपागर, डॉ. झेलम झेंडे, डॉ. सुजाता पाटील, प्रा. देवेंद्र कांबळे, मराठी विभागप्रमुख प्रा. गजानन चव्हाण, प्रा. प्रांजल भोईर, प्रा. भूषण ठाकूर, प्रा. तन्वी कोळी, प्रा. रेणू माळी व स्वयंसेवक विद्यार्थ्यांचा अतिशय सक्रिय सहभाग होता.

# करंजाडेत गौरा-गणपती उत्सव जल्लोषात

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास मंडळाच्या वतीने आयोजित अडीच दिवसांचा गौरा-गणपती उत्सव यंदा अत्यंत उत्साहात आणि पारंपरिक वातावरणात संपन्न झाला. करंजाडेचा विघ्नहर्ता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बाप्पाच्या दर्शनासाठी गणेशभक्तांनी मोठी गर्दी केली होती. मंडळाचे अध्यक्ष माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्या मार्गदर्शनाखाली यंदा विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे नेटके आयोजन करण्यात आले होते.



उत्सवादरम्यान सामाजिक बांधिलकी जपत मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात परिसरातील ३००हून अधिक नागरिकांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतली.

यासोबतच महिलांच्या कलागुणांना आणि उत्साहाला वाव देण्यासाठी विशेष मंगळागौर स्पर्धा आणि खेळ पैठणीचा यांसारख्या पारंपरिक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये करंजाडे परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने आणि उत्साहाने सहभाग घेतला. तसेच चिमुकल्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करून त्यांच्या सुप्त गुणांना मंच उपलब्ध करून देण्यात आला.

उत्सवाच्या सांगताप्रसंगी भक्तीमय वातावरणात सुश्राव्य भजन आणि भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. उत्सव यशस्वी करण्यासाठी मंडळाचे सचिव अमित यादव, उपसचिव चेतन आंग्रे, खजिनदार योगेश फापाळे, उपखजिनदार निखिल डांगे, कार्याध्यक्ष उमेश भोईर तसेच महिला मंडळाच्या चैताली माळी, चेतना भोईर, पूजा भोईर, शर्वरी पोईपकर, श्रुती दिवेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. सोहळ्याला माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, नगरसेविका ममता म्हात्रे, गुरुनाथ फडके, गजानन पाटील यांसह अनेक मान्यवरांनी भेटी देऊन मंडळाच्या उपक्रमांचे कौतुक केले.

# माणगावच्या आरोग्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर!

# १८३ कोटींच्या योजना गेल्या परत

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहराच्या स्वच्छता, पर्यावरण आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या भुयारी गटार योजना आणि घनकचरा व्यवस्थापन योजना स्थगित झाल्याने तब्बल १८३ कोटी रुपयांचा निधी परत जाण्याची वेळ आली आहे. या योजनांना मंजुरी मिळावी यासाठी खासदार सुनील तटकरे यांनी प्रयत्न केले होते. मात्र नगरसेवकांनी ठरावाला विरोध केल्याने या दोन्ही महत्त्वाकांक्षी योजना पुढे जाऊ शकल्या नाहीत.




भुयारी गटार योजनेसाठी तब्बल १५८ कोटी रुपये जागतिक बँकेच्या माध्यमातून उपलब्ध होणार होते. मात्र जवळपास सर्वच नगरसेवकांनी यासंदर्भातील ठराव नामंजूर केल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे माणगावच्या वाढत्या लोकसंख्येसमोर सांडपाणी व्यवस्थापनाचा प्रश्न पुन्हा गंभीर बनला आहे.

सध्या शहरातील गटारांचे सांडपाणी थेट काळ आणि गोद नदीच्या पात्रात सोडले जात असल्याच्या तक्रारी आहेत. सांडपाण्याच्या निचऱ्यासाठी प्रभावी व्यवस्था नसल्याने नदीपात्रातील पाणी प्रदूषित होण्याचा धोका निर्माण झाला आहे. पाणी आणि पर्यावरणाचा प्रश्न थेट नागरिकांच्या आरोग्याशी जोडलेला असल्याने भुयारी गटार योजना माणगावसाठी गरजेची असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, या योजनेला विरोध करण्यामागे विविध कारणे असल्याचे सांगितले जाते. योजनेचे काम झाल्यास शहरातील रस्ते मोठ्या प्रमाणावर खोदले जातील आणि त्यांची दुरुस्ती तातडीने होऊ शकणार नाही, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनींचा प्रश्न निर्माण होईल तसेच नागरिकांवर करांचा अतिरिक्त भार पडू शकतो, अशी भीती व्यक्त करण्यात आली होती. त्याऐवजी शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून प्रत्येक प्रभागात स्वतंत्र गटार व्यवस्था उभारावी, अशी नगरसेवकांची भूमिका असल्याचे समजते.

घनकचरा व्यवस्थापनाची स्थितीही समाधानकारक नसल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. शहरातील अनेक भागांत नियमित कचरा संकलन होत नसल्याचे नागरिकांकडून वारंवार सांगण्यात येते.

याच पार्श्वभूमीवर घनकचरा व्यवस्थापनासाठी २५ कोटी रुपयांची योजना मंजूर झाली होती. मात्र ही योजनाही नगरसेवकांनी फेटाळून लावल्याचे नगरपंचायतीचे कार्यकारी अधिकारी संतोष माळी यांनी सांगितले.

विशेष म्हणजे, नगरपंचायतीने याच वर्षी घनकचरा व्यवस्थापनासाठी १ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. शहराला दीर्घकालीन आणि शाश्वत कचरा व्यवस्थापनाची गरज अधोरेखित होत आहे.

या दोन्ही योजना मंजूर झाल्या असत्या तर माणगाव शहरातील सांडपाणी आणि घनकचऱ्याच्या समस्येला कायमस्वरूपी दिशा मिळाली असती, अशी चर्चा शहरात सुरू आहे. अलिबाग आणि रोहा येथे अशा योजना सुरू झाल्या असताना माणगाव मात्र पुन्हा एकदा मूलभूत नागरी सुविधांच्या प्रश्नावर मागे पडल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

## रोहा नगर परिषदेची अनधिकृत विक्रेत्यांच्या हातगाड्यांवर कारवाई

**रोहा : प्रतिनिधी**



रोहा अष्टमी नगर परिषदेच्यावतीने रोहा शहरातील बाजारपेठेत अनाधिकृतपणे रस्त्यावर ठिकठिकाणी उभ्या करण्यात आलेल्या केळी व फळ विक्रेत्यांच्या हातगाड्यांवर कारवाई करण्यात आली. त्यामुळे रोहा शहरातील रस्ते मोकळे झाल्याचे चित्र दिसत होते.

सातत्याने वाहतुकीस होत असलेल्या अडथळा, त्यातून निर्माण होणारे वाहतूक कोंडी, ज्येष्ठ नागरिकांना होणारा त्रास व नागरिकांच्या तक्रारीनुसार सातत्याने रोहा शहरातील बाजारपेठेत अनधिकृतपणे उभे राहत असलेल्या व केळी विक्रेत्यांच्या हातगाड्यांना नोटिसा देण्यात आले होत्या. परंतु त्या नोटीसीचा कोणताही परिणाम अनधिकृत रित्या रस्त्यावर उभे राहत असलेल्या फळ, केळी, भाजी विक्रेत्यांवर न झाल्याने बुधवारी अष्टमी नगर परिषदेच्या अधिकारी व कर्मचारी यांनी कारवाई करीत शहरातील बाजारपेठेमधील अनाधिकृत ठिकाणी उभे असलेल्या हातगाड्या ताब्यात घेत नगरपरिषद येथे जमा करण्यात आले होते. रोहा अष्टमी नगर परिषद च्या वतीने किमान २२ पेक्षा जास्त हातगडयांवर कारवाई केली आहे. नाशवंत माल असल्याने फळ विक्रेत्यांच्यावर दंडात्मक कारवाई करून सोडण्यात आले.

दरम्यान रोहा अष्टमी नगर परिषदेच्यावतीने फळ मार्केट उपलब्ध आहे. परंतु त्या ठिकाणी हे फळ विक्रेते बसत नाहीत असे दिसून येत असल्याने यापुढे फळ विक्रेते यांनी त्यांना देण्यात आलेल्या जागेवर व्यवसाय करावा असे नगरपरिषदेच्या वतीने सांगण्यात आले आहे. सध्या फळ, केळी विक्रेत्यांना तात्पुरती जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे

रोहा अष्टमी नगर परिषदेच्यावतीने कोणत्याही विक्रेते यांना त्रास देण्याचा हेतू नसून नगरपरिषदेने दिलेल्या नियमांचे व शिस्तीचे पालन करावे असे आवाहन रोहा अष्टमी नगरपरिषदेच्यावतीने पुन्हा एकदा करण्यांत आले असून मार्केट मध्ये फुल, भाजी, फळ विक्रेते यांचे नावावर असलेले गाळे मध्ये स्थलांतरित व्हावे अन्यथा रिकामे असणारे गाळे जप्त करण्यात येतील. जे विक्रेते यांचे कडे गाळे उपलब्ध नसतील त्यांनी नगरपरिषदेने तात्पुरती नियोजित केलेली जागा या ठिकाणी फळ विक्री, तसेच भाजी विक्री करणे बाबत रोहा अष्टमी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजयकुमार एडके यांनी सूचना दिल्या आहेत.

## रोह्यात साखरचौथ गणरायाला भाविकांकडून भावपूर्ण निरोप



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात साखरचौथ गणरायाचे मंगळवारी आगमन झाल्यानंतर विधीवत पूजाअर्चा करून बुधवारी भावपूर्ण निरोप गणेश भक्तांनी दिला आहे. रोहा शहरातील व अष्टमी शहरातील साखरचौथ गणरायाचे विसर्जन कुंडलिका नदीमध्ये करण्यात आले आहे.

गणेशोत्सवाची धामधूम संपल्यानंतर भाविकांच्या घरी व सार्वजनिकरित्या साखरचौथ गणरायाच्या आगमनाची प्रतीक्षा होती. मंगळवारी उत्साही वातावरणात गणपतीचे आगमन करून मंडळाने गणरायाची स्थापना केली. दोन दिवस पूजा आर्चा करून बुधवारी सायंकाळी रोहा शहरासह तालुक्यातील साखरचौथ गणरायाचे भावपूर्ण विसर्जन करण्यात आले.

रोहा शहरात सायंकाळी फटाक्यांची आतषबाजी करीत विविध वाद्यावर मिरवणुक गणरायाची काढण्यात आली होती. रोहा शहराचा तालुक्यातील मेढा, नागोठणे, खांब, कोलाड, सुतारवाडी, धाटाव, घोसाळे, भालगाव, चणेरा, यशवंतखार, पिंगळसई, देवकान्हे, धामणसई विभागातील गणरायाला गणेश भक्तांनी भावपूर्ण निरोप दिले आहे.

रोहा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सार्वजनिक २६ व खाजगी ७५ गणपतीची स्थापना करण्यात आली होती. रोहा पोलिसांकडुन पोलीस ठाणे हद्दीतील रोहा शहरासह गावात पोलीस निरीक्षक अभय शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्त ठेवण्यात आला होता. नगर परिषदेच्यावतीने नगराध्यक्ष वनश्री शेडगे व मुख्याधिकारी अजयकुमार एडके यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषद अधिकारी व कर्मचारी यांनी स्वच्छता व प्रकाश योजना सह अन्य विसर्जन ठिकाणी काम पाहिले.





अलिबाग : शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात साखरचौथ गणरायाचे बुधवारी सायंकाळी भावपूर्ण वातावरणात विविध वाद्यांच्या गजरात मिरवणुकीने विसर्जन करण्यात आले.

## श्री धावीर मंदिर सभामंडप, प्रदक्षिणा मार्गासाठी २ कोटी ३० लाख मंजूर

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहेकरांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री धावीर महाराज मंदिराच्या सभामंडप व पालखी प्रदक्षिणा मार्गाच्या विकासकामांसाठी तब्बल २३० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.



श्री धावीर महाराजांची दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी निघणारी पालखी रोहेकरांसाठी श्रद्धेचा आणि भावनेचा विषय आहे. या सोहळ्यात महाराजांना शासनाच्या वतीने सशस्त्र पोलीस मानवंदना दिली जाते. पूर्वापार पोलीस मानवंदना मिळणाऱ्या देशातील दोन मंदिरांपैकी श्री धावीर महाराजांचे मंदिर हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे श्रद्धास्थान असल्याने, या ऐतिहासिक परंपरेला साजेसा भव्य व सुसज्ज सभामंडप असावा, अशी भक्तांची मागणी होती.

भक्तांच्या सातत्यपूर्ण मागणीची दखल घेत खासदार सुनील तटकरे यांच्या विशेष प्रयत्नातून या कामाला निधी मंजूर झाला आहे. रायगड जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव किशन जावळे यांच्या स्वाक्षरीने प्रशासकीय मान्यता आदेश जारी करण्यात आला असून, हे पत्र आमदार अनिकेत तटकरे यांनी नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांच्याकडे सुपूर्द केले.

विशेष म्हणजे, प्रस्तावित सभामंडपाची वास्तुरचना रोह्याचेच वास्तुविशारद मोहित मोहिते यांनी केली आहे. त्यामुळे या श्रद्धास्थानाच्या विकासात स्थानिक वास्तुविशारदाचा सहभाग ही रोहेकरांसाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

श्री धावीर महाराजांचा नवरात्र उत्सव सुरू होण्यापूर्वीच ही आनंदाची बातमी मिळाल्याने भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सभामंडप आणि प्रदक्षिणा मार्गामुळे नवरात्र उत्सवातील सोहळे, धार्मिक कार्यक्रम व विविध उत्सवांसाठी अधिक सुविधा उपलब्ध होणार आहेत.

या विकासकामासाठी प्रशासकीय मान्यता मिळवून दिल्याबद्दल खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांचे रोहेकर नागरिकांनी आभार व्यक्त केले आहेत. श्रद्धा, परंपरा आणि आधुनिक सुविधांची सांगड घालणाऱ्या या कामामुळे श्री धावीर मंदिराच्या वैभवात निश्चितच भर पडणार आहे.

## वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बुधवारी (दि.30) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण १६२ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली.

## रोह्यात आज छत्रपती संभाजी महाराज उद्यान लोकार्पण सोहळा

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगरपरिषद हद्दीतील मेहेंदळे हायस्कूल समोरील जागेत माजी राज्यसभा सदस्य श्री धैर्यशील मोहन पाटील यांच्या निधीतून खासदार स्थानिक विकास कार्यक्रम योजनेअंतर्गत छत्रपती संभाजी महाराज उद्यानाचे लोकार्पण खा. सुनील तटकरे यांच्या हस्ते आज २ ऑक्टोंबर दुपारी ३ वाजता होणार आहे. अशी माहिती नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी दिली आहे.

या कार्यक्रमास महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, आ. अनिकेत तटकरे, माजी खासदार धैर्यशील पाटील, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, सभापती राजेंद्र जैन, महेश कोलाटकर, महेंद्र दिवेकर, रवींद्र चाळके, निता हजारे, गौरी बारटक्के, महेंद्र गुजर, यासह नगरसेवक, नगरपरिषद अधिकारी, कर्मचारी व रोहा अष्टमीकर नागरिक आदी उपस्थित राहणार आहेत.

## पेण शहरासह तालुक्यात ठिकठिकाणी सार्वजनिक आणि घरगुती साखरचौथ गणपतींची प्रतिष्ठापना

**पेण : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाची जल्लोषात सांगता झाल्यानंतर मंगळवारी पहिल्या संकष्टी चतुर्थीला पेण तालुक्यात ठिकठिकाणी सार्वजनिक आणि घरगुती साखरचौथ गणपतींची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.

पेणमध्ये मोठ्या उत्साहात साखरचौथ गणेशोत्सव साजरा करण्यात येत असून सकाळी मिरवणुकीने सारखचौथ गणपतीचे आगमन होऊन विधीपूर्वक श्रींची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे मंडळातर्फे आयोजन करण्यात आले असून सर्वत्र मंगलमय असे पवित्र वातावातावरण निर्माण झाले आहे

पेणमध्ये अष्टविनायक मित्रमंडळ, ओरिजनल अष्टविनायक मित्रमंडळ, प्रेमनगर मित्रमंडळ चिंचपाडा, कवंडाळ तळ्याचा राजा, मातोश्री मित्र मंडळ, सुंदरनगर मित्रमंडळ, साई माऊली गणेशोउत्सव मंडळ नरदास चाळ, श्री गणेश उत्सव मंडळ कोळीवाडा, महाकाली मित्रमंडळ कासारआळी, शिक्षक सोसायटी मित्रमंडळ, चिंतामणी विश्वराज पिंपळपाडा, जय गणेश मित्रमंडळ बोरगाव, श्री मित्रमंडळ, न्यु यंग गणेश मंडळ, मित्रमंडळ दामुगुडे आळी, ओम श्री मित्रमंडळ विठ्ठल आळी, शिवसमर्थ मित्रमंडळ आबेघर, साखरचौथ ग्रामस्थ मंडळ इरवाडी आदी ठिकाणी सार्वजनिक मंडळासह घरगुती सारखचौथ गणपतीची तालुक्यात प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. त्यामध्ये पेण पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात ६५ सार्वजनिक व ८५ घरगुती साखरचौथ गणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहेत.

या गणेशोत्सवानिमित्त सर्वत्र भव्य मंडपे उभारण्यात आली असून विद्युत रोषणाईसह मनमोहक अशी सजावट करण्यात आली आहे. गणपतीच्या दर्शनासाठी भाविकांची सकाळपासून सर्वत्र रिघ लागल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.



ओरिजिनल अष्टविनायक मित्र मंडळ



मातोश्री मित्र मंडळ गणपती



अष्टविनायक मित्र मंडळाचा गणपती



कौंडाळ तळ्याचा राजा

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| **Tend-30/26-27 7000041715** | Structural strengthening of 100kV Jite - Thal TSS D/C line tower foundation of loc No. 79, 81, 90, 94, 95, 89, 91 line creek area under EHV lines S/Dn. Panvel 2 on urgent basis. **Tender Fee Rs. 5000/- + GST** | Rs. 191.90 Lakhs including taxes |

EMD 1 % of estimated cost. **Submission of bids from 01.10.2026 at 11:00 Hrs. to 12.10.2026 up to 11:00 hrs. Opening date: 12.10.2026 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer (Adm)
**Mob. No.** 8412050202, **E-mail ID** se7200@mahatransco.in

Sd/-
**Superintending Engineer, EHV (O&M) Circle, Panvel**

# चक दे इंडिया!

## पाकला हरवत भारतीय हॉकी संघ फायनलमध्ये



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशियाई क्रीडा स्पर्धेत थरारक सामन्यात अखेरच्या मिनिटाला अभिषेकने अप्रतिम विजयी गोल डागत भारताला पाकिस्तानविरुद्ध ४-३ असा विजय मिळवून दिला. या विजयासह भारतीय संघाने आशियाई क्रीडा स्पर्धेच्या पुरुष हॉकीच्या फायनलमध्ये दिमाखात प्रवेश केला. आता फायनलमध्ये भारताचा सामना दक्षिण कोरिया आणि मलेशिया यांच्यातील दुसऱ्या सेमीफायनलमधील विजेत्या संघाशी होणार आहे.

साखळी फेरीतील पाचही सामने जिंकत दमदार कामगिरी करणाऱ्या टीम इंडियाने पाकिस्तानविरुद्धही आपला विजयी सिलसिला कायम राखला. सामन्याच्या पहिल्या क्वार्टरमध्ये भारताचा कर्णधार हरमनप्रीत सिंगने पेनल्टी कॉर्नरवरून दोन गोल करत टीम इंडियाला २-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर दुसऱ्या क्वार्टरमध्ये सुखजीत सिंगने आणखी एक गोल डागत भारताची आघाडी ३-० अशी केली.

पहिल्या हाफचा खेळ संपण्याच्या काही क्षण आधी पाकिस्तानच्या अबू महमूदने गोल करत भारताची आघाडी ३-१ अशी कमी केली. त्यानंतर तिसऱ्या क्वार्टरच्या अखेरीस हन्नान शहदीने पाकिस्तानसाठी आणखी एक गोल केला. त्यामुळे पाकिस्तानने पिछाडी ३-२ अशी भरून काढली. चौथ्या क्वार्टरच्या सुरुवातीलाच वहीद राणाने गोल करत पाकिस्तानला ३-३ अशी बरोबरी मिळवून दिली. पाकिस्तानने अचानक केलेल्या पुनरागमनाने सामन्याला कलाटणी मिळाली, पण अभिषेकने अगदी शवेटच्या मिनिटाला भन्नाट मैदानी गोल करून भारताला ४-३ असा रोमहर्षक विजय मिळवून दिला.

भारतीय पुरुष हॉकी संघ १९९८नंतर प्रथम अंतिम फेरीत पोहचला आहे. जर संघाने सुवर्णपदक जिंकले, तर त्यांना २०२८च्या ऑलिम्पिकसाठीही पात्रता मिळेल.

## सेलिंगमध्ये भारताला रौप्यपदक

**नवी दिल्ली** : आशियाई खेळांमध्ये सेलिंगच्या पुरुष स्किफ प्रकारात मनू फ्रान्सिस आणि प्रिन्स नोबल कुरिसिंगल यांच्या जोडीने रौप्यपदक पटकावले. या स्पर्धेत भारताचे हे यंदाच्या आशियाई खेळातील पहिले सेलिंग पदक ठरले आहे.

याआधी स्क्वॅशच्या उपांत्य फेरीत भारताच्या महिला संघाचा हाँगकाँगकडून १-२ असा पराभव झाला. त्यामुळे भारताच्या संघाला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. या संघात जोशना चिनप्पा, अनाहत सिंह आणि तन्वी खन्ना यांचा समावेश होता. यानंतर सेलिंगमध्ये मनू फ्रान्सिस आणि प्रिन्स नोबल कुरिसिंगल यांनी पुरुषांच्या स्किफ स्पर्धेत दुसरे स्थान मिळवत रौप्यपदक जिंकले.




## ‘सीकेटी’च्या स्पर्धकांचे जिल्हास्तरीय ज्युदो स्पर्धेत यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या सहकार्याने पनवेल महानगरपालिकेच्या वतीने रामशेठ ठाकूर कॉलेज खारघर येथे १७ व १९ वर्षाखालील मुले व मुलींची जिल्हास्तरीय ज्युदो स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयाने यश प्राप्त केले.

सार्थक प्रमोद दाभोळकर (इ.११वी) याने द्वितीय क्रमांक, तर जितेश अर्जुन सुरते (इ. ११वी), स्वस्तिक सतीश भोसले (इ. ११वी), दक्षता प्रकाश रिसबूड (इ. १२वी) यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील, माधवी कोळी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## भारत-पाक उद्या ‘गोल्ड’साठी भिडणार!

### आशियाई क्रीडा स्पर्धेत हायव्होल्टेज सामना

**नागोया : वृत्तसंस्था**

आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुष क्रिकेटच्या दुसऱ्या सेमीफायनलमध्ये भारतीय संघाने श्रीलंकेचा पराभव करत दिमाखात फायनलमध्ये प्रवेश केला. सुवर्णपदकाचा बचाव करण्यासाठी श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील टीम इंडिया ३ ऑक्टोबर रोजी पाकिस्तानविरुद्ध भिडणार आहे.

२०२२च्या हांगझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय संघ ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली पहिल्यांदा या स्पर्धेत सहभागी झाला होता. फायनलमध्ये श्रीलंकेचा पराभव करत टीम इंडियाने थेट सुवर्णपदकावर नाव कोरले. या स्पर्धेत बांगलादेशने कांस्यपदक पटकावले होते. आता २०२६मध्ये भारतीय संघ सुवर्णपदकाचा बचाव करण्यासाठी पाकिस्तानविरुद्ध मैदानात उतरणार आहे.

पाकिस्तानने पहिल्या सेमीफायनलमध्ये बांगलादेशचा पराभव करत फायनलचे तिकीट मिळवले आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच भारत आणि पाकिस्तान यांच्यात पुरुष क्रिकेटच्या सुवर्णपदकासाठी मेगा फायनल रंगणार आहे.




## बॉक्सिंग स्पर्धेत नवी मुंबईतील विद्यार्थ्यांची दमदार कामगिरी



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत ठाणे जिल्हा क्रीडा परिषदेच्या सहकार्याने नवी मुंबई महानगरपालिका जिल्हास्तरीय शालेय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धेचे आयोजन क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. मरीन सेंटर, से. ११, वाशी येथील सुसज्ज अशा बॉक्सिंग रिंगवर झालेल्या या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

स्पर्धेचा शुभारंभ क्रीडा, सांस्कृतिक व युवक कल्याण समितीचे सभापती गिरीश म्हात्रे यांच्या हस्ते आणि उपसभापती राजू (रॉबीन) मढवी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या स्पर्धेत नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रातील विविध शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांतून १४, १७ व १९ वर्षाआतील मुले व मुली सहभागी झाले होते.

१४ वर्षांखालील मुलांच्या विविध वजनी गटात लकी निशाद, समर्थ ताटे, शिवरुद्रा इंगुळकर, कैवल्य थोरात, श्रेयस बाबर, संकेत करे, अविनाश प्रसाद, मीत नाईक, जय समदर, अय्यान वास्कर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

१७ वर्षांखालील मुलांच्या विविध वजनी गटात अराफत मुलानी, अथर्व बदापुरे, अली खान, विघ्नेश पाठक, शौर्य कुलकर्णी, वंश पाटील, दिनेश बुगाटी, याहा नाखवा, जाहीद सोफी, ओमकार ताकवडे, दुर्वेश गोकर्णकर, कैसर शेख, अंश राय प्रथम क्रमांक संपादन केला. मुलींच्या गटात आर्या शिंदे, मनस्वी हांडे, रिया बेहरा, रुशिता धुमाळ, हर्षाली भोईर, श्रावणी पाटील, मिहीका लाले, भाव्या वाघमारे, तेरणा आर्किड, शिवान्या जाधव, रिद्धी पावसे, वेदिका सत्रे, विजबाला ए यांनी प्रथम क्रमांक मिळविला.

१९ वर्षाआतील मुलांच्या विविध वजनी वेदांत कोरडे, सनी कुशवाह, प्रथमेश सणस, अनिरुद्ध निकम, साहिल अब्बास सय्यद, प्रियान्शु दुधाने, लॅनिश कुंडीत, जोशुआ फलकाव, आर्यन दासगुप्ता, मुकूंद के यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. मुलींच्या गटात लक्ष्मी सरोज, प्रितीका गौडर, प्राची आनंद, मनदीप कौर सैनी, प्रिया यादव, निधी चाळके, श्रद्धा यादव, हर्षिनी पांडे यांनी प्रथम क्रमांकाला गवसणी घातली.



## विंडीजविरुद्ध शुबमन गिलची बॅट पुन्हा तळपली!

### द्विशतकी खेळीसह संघाला मिळवून दिला विजय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजने बुधवारी झालेल्या दुसऱ्या वनडे सामन्यात टीम इंडियासमोर ४०६ धावांचे आव्हान ठेवले होते. प्रत्युत्तरात कर्णधार शुबमन गिलने सामन्यात नाबाद द्विशतकी खेळी करून संघाला शानदार विजय मिळवून दिला. ‘हिटमॅन’ रोहित शर्माने शतक ठोकून गिलला छान साथ दिली.

गिलचे वनडे क्रिकेटमधील हे दुसरे द्विशतक आहे. याआधी त्याने २०२३मध्ये न्यूझीलंडविरुद्ध २०८ धावांची खेळी केली होती. त्यावेळी तो पुरुषांच्या वनडे क्रिकेटमध्ये द्विशतक झळकावणारा सर्वात युवा फलंदाज ठरला होता.

गिलची ही कामगिरी त्याच्या सातत्यपूर्ण प्रगतीचे आणखी एक उदाहरण ठरली आहे. त्याने विंडीजविरुद्धच्या पहिल्या वनडेत शतक केले होते. आयसीसीच्या नोंदीनुसार गिलने वनडेमध्ये दोन हजार धावांचा टप्पाही वेगाने गाठला असून तो या विक्रमातील आघाडीच्या फलंदाजांपैकी एक आहे.

भारतीय संघाने अवघ्या ४३.३ षटकांत ४०६ धावांचे लक्ष्य गाठत सामना आपल्या नावावर केला. या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com